cmyk

## संपादकीय

### ठोस भूमिका विश्वास निमार्ण करणारी

दहशतवाद, अमेरिकेची कथित मध्यस्थी यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अगदी निःसंदिग्ध भूमिका मांडली. या बाबींशी ज्या देशांचा संबंध आहे त्यांना ते समजून घ्यावे लागेलच, भारतातीलही पक्ष-विपक्ष यांनाही ते समजून पुढे जावे लागेल. त्यांच्या हरकती आणि आक्षेपांमुळे उगाच आपला शक्तिपात होणार नाही याची खबरदारी घेण्यासाठी हे महत्त्वाचे आणि अत्यंत आवश्यकही आहे. भारत आणि पाकिस्तानच्या विषयावर आम्हाला कोणत्याही तिसऱ्या देशाची मध्यस्थी नको असल्याचे मोदींनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना स्पष्ट सांगितले. त्याच वेळी दहशतवादाबाबत दुहेरी निकष नकोत असे त्यांनी जी-७ शिखर परिषदेत सांगितले.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com


### इराणवरील हल्ल्यानंतर पाकिस्तानची अमेरिकेवर टीका

कराची : गेल्या महिन्यात झालेल्या भारत-पाकिस्तान वादात ''निर्णायक राजनैतिक हस्तक्षेप'' केल्याबद्दल आणि २०२६ च्या नोबेल शांतता पुरस्कारासाठी त्यांना पाठिंबा दिल्याबद्दल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कौतुक केल्यानंतर एका दिवसानंतर, पाकिस्तानने रविवारी इराणी अणुस्थळांवर वॉशिंग्टनच्या लष्करी हल्ल्यांवर तीव्र टीका केली. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने त्यांच्या अधिकृत एक्स अकाउंटवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की अमेरिकेचे हल्ले आंतरराष्ट्रीय कायद्याच्या सर्व नियमांचे उल्लंघन करता, तसेच संयुक्त राष्ट्रांच्या चार्टर अंतर्गत स्वतःचे रक्षण करण्याचा इराणला पूर्ण अधिकार आहे. या प्रदेशात तणाव आणखी वाढण्याची शक्यता आम्हाला गंभीरपणे जाणवत आहे.


बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-६० | सोमवार, दि.२३ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


# पाणी संचयात वाढ ; शेतकऱ्यांना दिलासा!

## जूनमध्येच राज्यातील धरणांत ३७% जलसाठा

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील पावसाळा यंदा जून महिन्याच्या सुरुवातीलाच दमदारपणे दाखल झाला आणि त्याचा सकारात्मक परिणाम सरळ आपल्या धरणांवर पडला आहे. गेल्या काही वर्षांतील अनुभव पाहता, जूनच्या सुरुवातीलाच एवढ्या मोठ्या प्रमाणात पावसाचे आगमन होणे दुर्मीळच. पण यंदा पावसाने कोणताही वेळ न दवडता आपले अस्तित्व दाखवून दिले आहे. त्यामुळेच राज्यातील अनेक धरणं भरत चालली आहेत आणि या भरून येणाऱ्या धरणांमुळे शेतकऱ्यांच्या मनातल्या पाण्याची चिंता कमी झाली आहे.**

पारंपरिकपणे, जून महिन्यात धरणं अजून कोरडी असतात, पाणी साठ्याचे आकडे एकतर अत्यल्प असतात किंवा काही ठिकाणी तर शून्यालाच टेकलेले असतात. पण यंदा चित्र पूर्ण वेगळे आहे. सध्या महाराष्ट्रातील एकूण धरणांमध्ये पान २ वर



## मराठवाड्यातील उपयुक्त पाणीसाठा ३५ टक्क्यांवर

**मराठवाड्यातील अकरा मोठ्या प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा ३५.७५ टक्क्यांवर आला आहे. सर्वांत मोठ्या जायकवाडी प्रकल्पात ३१.१८ टक्के म्हणजे २३.९० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. माहितीनुसार, जायकवाडी प्रकल्पात शनिवारी १४०३१ क्युसेकने पाण्याची आवक सुरू होती. पावसाचा जोर वाढल्याने पुढील काळात प्रकल्पातील पाणीसाठा वाढण्याची आशा आहे.**



मराठवाड्यातील मोठ्या अकरा प्रकल्पांमध्ये १२७.९० टीएमसी पाणीसाठा झाला आहे. ज्यामध्ये सरासरी ६६.४० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. निम्न दुधना प्रकल्पात ६.७२६ टीएमसी पाणीसाठा झाला असून, त्यापैकी ३.१० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. येलदरी प्रकल्पात १८.६८२ टीएमसी एकूण पाणीसाठा झाला असून, त्यापैकी १४.२८ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. सिद्धेश्वर प्रकल्पात ६.५७२ टीएमसी एकूण पाणीसाठा झाला असून, ०.५७ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. माजलगाव प्रकल्पात ६.३६७ टीएमसी पाणीसाठा असून, त्यापैकी १.३५ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा पान २ वर

## थोडक्यात...

### भास्कर जाधवांनी राजकारणातून निवृत्त होऊ नये- छगन भुजबळ

नाशिक : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी राजकारणातून निवृत्त होण्याचे संकेत दिले होते. यावर मंत्री छगन भुजबळ यांनी भाष्य केले आहे. भास्कर जाधवांनी राजकारणातून निवृत्त होऊ नये, असे भुजबळ म्हणाले आहेत. राजकारणात चढ-उतार होत असतात, मात्र त्यामुळे राजकारण सोडून देणे हे पटत नसल्याचे ते म्हणाले.

### पंतप्रधान मोदींचा इराणच्या राष्ट्रपतींना फोन

नवी दिल्ली-पंतप्रधान मोदी यांनी इराणच्या राष्ट्रपतींना फोन केला असून इराण-इस्रायल तणावावर चिंता व्यक्त केली आहे. दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्याचे आवाहन केले असल्याची माहिती पंतप्रधान मोदींनी एक्स पोस्टद्वारे दिली आहे.

### मनसेवर टीका करताना अबू आझमी बरळले

मुंबई : मनसेवर टीका करताना समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी बरळले आहेत. मराठीचा मुद्दा हा काय मुद्दा आहे का असे अबू आझमी म्हणाले आहेत. मनसेचे नेते मराठीच्या मुद्द्यावरुन जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मराठीचा सन्मान करा मात्र हिंदीचा अपमान करु नका असेही ते यावेळी म्हणाले आहेत. सोलापूरमध्ये पत्रकारांशी बोलाताना त्यांनी हे विधान केले आहे.

### पहलगाम हल्ल्याप्रकरणी दोघांना अटक

जम्मू : पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याप्रकरणी एनआयएने बटकोटमधून दोघांना अटक केली आहे. दहशतवाद्यांना आश्रय दिल्याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. बशीर अहमद जोथर आणि परवेझ जोथर अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. दोन्ही आरोपींच्या चौकशीतून तीन दहशतवादी पाकिस्तानी संघटना लष्कर ए तोयबाशी संबंधित असल्याची माहिती समोर आली आहे.

### मराठवाड्यात ४७० टँकरद्वारे पाणीपुरवठा

संभाजीनगर-मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्रटंचाई जाणवत आहे. विभागातील ३७६ गावे आणि वाड्यांमध्ये अद्यापही ४७० टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यामध्ये सर्वाधिक टँकर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सुरू आहेत. इतर जिल्ह्यांमध्येही टंचाईचे प्रमाण कमी असले तरी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अजूनही पूर्णपणे सुटलेला नाही.

### मी भाजपमध्ये जाणार नाही-एकनाथ खडसे

जळगाव-एकनाथ खडसे यांनी पंढरपुरमध्ये बोलताना मोठे विधान केले आहे. मी भाजपमध्ये जाण्याचा प्रश्नच येत नाही. भाजपमध्ये परत जाण्याच्या चर्चेला मी पूर्णविराम दिला आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये समाधानी आहे, असे खडसे यांनी म्हटले आहे.

## माऊली..माऊली..!



पुणे - वारकरी संप्रदायामध्ये अनन्य साधारण महत्व असलेल्या संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या पालखीचे आळंदी येथून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाले आहे. दिवे घाटातील पालखीचे हे विहंगम दृश्य.

## शिवसेना हायजॅक करण्याचा प्रस्ताव राऊतांनीच मांडला

### मंत्री गुलाबराव पाटलांचा खळबळजनक दावा

**जळगाव । प्रतिनिधी**

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या बंडाच्या वेळी संजय राऊत यांनाही सोबत गुवाहटीला यायचे होते. मात्र, सोबतच्या आमदारांनी संजय राऊतांना कडाडून विरोध केला. तसेच शिवसेना हायजॅक करण्याचा प्रस्ताव हा संजय राऊतांचाच असल्याचेही पाटील यांनी म्हटले आहे.**





राज्यातील शिवसेना पक्षात फूट पडून आता ३ वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. गेल्या ३ वर्षात दोन्ही शिवसेना पक्षातील नेते एकमेकांवर टीका करत असून निवडणुकांनाही ते सामोर गेले आहेत. आधी लोकसभा, नंतर विधानसभा निवडणुकांमध्ये शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना पाहायला मिळाला. आता, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पान २ वर

## पालख्यांमुळे रस्ता जाम होतो

### अबू आझमी यांचे वादग्रस्त वक्तव्य

**सोलापूर । प्रतिनिधी**

**आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे अनेकदा चर्चेत राहिलेले समाजवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार अबू आझमी यांनी आणखी एक वादग्रस्त वक्तव्य केले. महाराष्ट्रात ठिकठिकाणांहून वारकऱ्यांच्या पालखी पंढरपूरकडे रवाना झालेल्या असतानाच त्यावरच आजमी यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्याने मोठा वाद होण्याची शक्यता आहे.**




पालख्यांमुळे रस्ता जाम होतो, हिंदूंचे सण साजरे केले जातात तेव्हा मुस्लिम व्यक्ती विरोध करत नाहीत. मात्र मुस्लिमांनी १० मिनिटे रस्त्यावर नमाज पठण केल्यावर आमच्यावर कारवाया होतात, असे वक्तव्य आझमी यांनी केले आहे. आझमी म्हणाले, पालख्यांमुळे रस्ता जाम होतो, रस्त्यावर हिंदूचे अनेक सण साजरे केले. त्यावेळी कोणताही मुस्लिम व्यक्ती हिंदू सणांविरोधात तक्रार करत नाही. तर मग मुस्लिम व्यक्ती दहा मिनिटासाठी रस्त्यावर नमाज पठण केल्यावर तक्रारी पान २ वर

## अहमदाबाद विमान दुर्घटनेचे दोषी सापडले

### एअर इंडियाच्या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना केले बडतर्फ

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**अहमदाबाद एअर इंडिया विमान अपघातासाठी एअर इंडयिाच्या तीन वरिष्ठ अधिकारी पायल अरोरा (क्रू शेड्युलिंग-प्लॅनिंग), पिंकी मित्तल (चीफ मॅनेजर, क्रू शेड्युलगिं) आणि चुरा सिंग (विभागीय उपाध्यक्ष) यांना जबाबदार धरण्यात आले आहे. या तीनही अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले आहे.**



१२ जून २०२५ ला अहमदाबादहून लंडनच्या गॅटविकला जाणारे बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनर विमान टेकऑफ केलं आणि काही मिनिटांत होत्याचे नव्हते झाले. पान २ वर

## वाल्मिक कराडची प्रकृती बिघडली

### जेलमध्येच वैद्यकीय पथकाकडून तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड सध्या बीडच्या तुरुंगात आहे. मात्र वाल्मीक कराडची तब्येत अचानक बिघडल्याची माहिती समोर आली आहे. शनिवारी रात्री वैद्यकीय पथकाकडून त्याची तपासणी करून



त्याच्यावर उपचार करण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कराडला पान २ वर

## निवडणूक आयोगाचा निर्णय लोकशाहीविरोधी-प्रकाश आंबेडकर

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय निवडणूक आयोगाचा हा निर्णय विश्वासघातकी, लोकशाहीविरोधी आणि पारदर्शकताविरोधी आहे. मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका आयोजित करण्याची जबाबदारी असलेली निवडणूक आयोग निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या विरोधात का आहे? कारण डिसेंबर २०२४ मध्ये, निवडणूक आयोगाने निवडणूक नियम १९६१ मध्ये सुधारणा केल्या होत्या. ज्यामुळे काही निवडणूक-संबंधित नोंदींवर सार्वजनिक प्रवेश मर्यादित झाला होता, असे मी आधीच म्हटले होते, अशा शब्दांत प्रकाश आंबेडकर यांनी निवडणूक आयोगावर निशाणा साधला.

केंद्रीय निवडणूक आयोगाने काही दिवसांपूर्वीच मतदान प्रक्रियेशी संबंधित व्हिडीओ फुटेज आणि फोटो जतन करण्याच्या पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.१९ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३७.५० क्विंटल | १,७४१ | २,६३० | २,३०५ |
| ज्वारी/हायब्रिड : ५८.०० क्विंटल | २,२०३ | २,८७४ | २,५६९ |
| मका/लोकल:२१.००क्विंटल | २,२०० | २,४०० | २,२६६ |
| तूर : ३०.०० क्विंटल | ६,०५० | ६,५६५ | ६,३१५ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,४४१ | ६,४४१ | ६,४४१ |
| बाजरी: २९.०० क्विंटल | १,८५१ | २,७०० | २,३४१ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:४८.५० क्विंटल | ४,२७५ | ४,३११ | ४,२९३ |
| हरभरा:२१.०० क्विंटल | ३,४०० | ५,४०० | ५,०८७ |

# पंढरपुरात सलग १० दिवस मास विक्रीस बंदी

## आषाढी वारीनिमित्त पालकमंत्री गोरेंची घोषणा





पंढरपूर । प्रतिनिधी

यंदा प्रथमच आषाढी वारीच्या इतिहासात यात्रा कालावधीतील सलग १० दिवस पंढरपुरातील मास मटन विक्रीस बंदी करण्यात आली आहे. याबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी माहिती दिली आहे.

आषाढी वारीचा सोहळा जवळ येत आहे. लाखो वारकरी पालख्यांसोबत पंढरीच्या दिशेनं आपल्या लाडक्या विठुरायाच्या भेटीसाठी मार्गस्थ होत आहेत. या काळात रस्त्यावर ठिकठिकाणी उघडपणे मास मटन विक्रीची दुकाने मार्गात लागत असतात. याशिवाय पंढरपुरात प्रवेश करतानाही विविध मार्गावर अशी मास मटन विक्रीची दुकाने आहे. गेल्या अनेक वर्षापासून पालखी सोहळा प्रमुख आणि वारकरी संप्रदायाचे संत मंडळी यांनी यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातील आणि पालखी सोहळा येताना संबंधित गावातील मास मटन विक्री बंद पान २ वर

### जिथे पालखी तिथे मांस विक्रीस बंदी

दरम्यान, याच पद्धतीने पालखी मार्गावर ज्या दिवशी पालखी ज्या गावात प्रवेश करेल आणि त्या गावातून प्रस्थान ठेवेल तेवढा संपूर्ण कालावधी संबंधित गावातील मटन विक्रीस बंदी घालण्यात आलेली आहे. याचे वारकरी संप्रदायातून स्वागत होत आहे. गेल्या अनेक वर्षापासून केलेल्या मागणीला अखेर फडणवीस सरकारने मान्यता दिली आहे.

cmyk

## अग्रलेख

# ठोस भूमिका विश्वास निमार्ण करणारी

दहशतवाद, अमेरिकेची कथित मध्यस्थी यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अगदी निःसंदिग्ध भूमिका मांडली. या बाबींशी ज्या देशांचा संबंध आहे त्यांना ते समजून घ्यावे लागेलच, भारतातीलही पक्ष–विपक्ष यांनाही ते समजून पुढे जावे लागेल. त्यांच्या हरकती आणि आक्षेपांमुळे उगाच आपला शक्तिपात होणार नाही याची खबरदारी घेण्यासाठी हे महत्त्वाचे आणि अत्यंत आवश्यकही आहे. भारत आणि पाकिस्तानच्या विषयावर आम्हाला कोणत्याही तिसऱ्या देशाची मध्यस्थी नको असल्याचे मोदींनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना स्पष्ट सांगितले. त्याच वेळी दहशतवादाबाबत दुहेरी निकष नकोत असे त्यांनी जी–७ शिखर परिषदेत सांगितले.

आणखी एक गोष्ट भारताच्या संदर्भात अशी घडली की खलिस्तानवादी गटांकडून भारताच्या विरोधातील कारवायांसाठी कॅनडाचा वापर केला जात असल्याची कबुली खुद्द कॅनडानेच दिली. त्यांच्या सुरक्षाविषयक संस्थेनेच हे मान्य केले असून त्यांनी हे मान्य करण्याची ही पहिलीच वेळ. त्याहून पुढची आणि ठळक बाब अशी की, जे खलिस्तानवादी कॅनडात सक्रिय होते त्यांना केवळ गट मानले जात होते. तथापि, आताच्या अहवालात या गटांचा थेट दहशतवादी असाच उल्लेख करण्यात आल्यामुळे भारताचा हा एक मोठा राजनैतिक विजयही आहे. झालेल्या घडामोडी वेगवेगळ्या भासत असल्या, तरी त्याच्या मुळाशी एकच कारण आहे व ते म्हणजे दहशतवाद. पाकिस्तानने त्याला जिहाद, मुजाहिद्दीन, स्वातंत्र्यलढा असले लाख मुलामे दिले तरी अंतःस्थ हेतू भारताला जखम करणे हाच राहिला आहे. ज्यांच्या कोणाच्या मनात पाकिस्तानच्या दुष्कृत्यांबद्दल अद्यापही सॉफ्ट कॉर्नर होता तेही पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर स्तब्ध झाले. कोणी भारताच्या बाजूने युद्धात उतरले नाही अथवा उतरावे अशी अपेक्षाही नव्हती. मात्र, ज्यांना एरव्ही पाकिस्तानच्या कृत्यांकडे सोईस्कर दुर्लक्ष करण्याची सवय जडली होती त्यांचीही अडचण झाली. भारताने आपल्या पद्धतीने पुढे जे काय करायचे ते केले आणि अनपेक्षित तडाखा बसल्यामुळे पाकिस्तानने युद्धबंदीचा प्रस्ताव मांडला. तो भारत आणि पाकिस्तानातील अधिकारी स्तरावर झाला आणि त्यानुसार स्थगितीचा निर्णय झाला. यात अमेरिकेच्या अध्यक्षांची ट्रम्प महाशयांची अनपेक्षित दखल झाली. युद्धबंदी अधिकृतपणे जाहीर करण्याच्या काही मिनिटे अगोदर त्यांनी ही माहिती समाजमाध्यमांतून दिली आणि नंतर जगभर फिरून किमान डझनभर वेळा त्याचा गवगवा केला. त्यांना स्वतःला 'पीसमेकर' म्हणवून घेण्याची हौस आहे. भारत–पाकिस्तान विषयात ते तुणतुणे वाजवण्याचा प्रयत्न करत आहेत. पाकिस्तानसोबत काश्मीरसह प्रत्येक मुद्द्यावर भारताची भूमिका द्विपक्षीय चर्चेवरच केंद्रित राहिली आहे. कोणत्या तिसऱ्या पक्षाचा सहभाग भारताने पूर्वीपासून कधीच मान्य केला नाही. संयुक्त राष्ट्रांनी आणि अन्य काही देशांनी याबाबत पुढाकार घेण्याचा प्रयत्न जरूर करून पाहिला, मात्र, ते भारताने फेटाळून लावले. याउपरही माझ्यामुळेच झाल्याचे जे टुमणे ट्रम्प यांनी लावले आहे त्यावर पंतप्रधानांनी त्यांनाच थेट शब्दांत सांगितले हे बरे झाले. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने एक महत्त्वाचे काम केले आहे. दहशतवादाकडे आता छुपे युद्ध म्हणून नाही तर युद्ध म्हणूनच पाहिले जाईल असे जाहीर करून टाकले. तेही पाकिस्तानला आता भारताकडून निषेधाच्या पलीकडे काहीतरी हादरा बसू शकतो या धोक्याचा इशारा देणारे आहे आणि त्याची चुणूक 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे त्यांना दिसली आहे.

व्यापार कराराची भीती दाखवत अमेरिका भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न करतो आहे. तर आपल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पाकिस्तानला कर्ज देऊन आणि आपला हेतू साध्य करण्यासाठी चीनही भारताची कोंडी करतो. जे पाकिस्तानातून कित्येक दशके भारताच्या विरोधात केले जात होते ते कॅनडातूनही सुरू झाले आहे. खलिस्तानवाद्यांकडे डोळेझाक करणे म्हणजे त्यांना बळ देणे आणि प्रोत्साहन देण्यासारखेच होते. उघड उघड भारताच्या दूतावासांवर हल्ले होणे, मंदिरांवर हल्ले होणे, भारतीयांना लक्ष्य करण्याचे प्रकार परदेशात होत असताना कॅनडाचे अगोदरचे पंतप्रधान एका फुटकळ खलिस्तानवाद्याच्या कथित हत्येवरून भारतालाच आरोपीच्या पिंजर्यात उभे करते झाले. तेथील नव्या पंतप्रधानांनी काही चुका दुरूस्त करण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत ही भारतासाठी दिलासा देणारी बाब ठरावी.

भूतकाळात लावलेल्या या झाडांना आलेली ही फळे आहेत. इस्रायल, अमेरिका आणि युरोपातील अनेक देशांनाही याची झळ सोसावी लागली आहे. मात्र, एखाद्या घटनेपुरतीच ही झळ असल्यामुळे ते फारसे गांभीर्याने याकडे बघत नाहीत. याचा अर्थ त्यांची समस्या नाही म्हणजे जगात अन्य कोणाचीही समस्या नाही असे मानता येत नाही. दहशतवादाबाबत हाच दुटप्पीपणा धोकादायक आहे. दोन देशांतील वादात तिसरा नको हे आवश्यक आहेच, त्याचप्रमाणे दोन सत्तांमधील संघर्षात दहशतवादीही नकोत.

## अपात्र केलेल्या सरपंच/सदस्य यांना पात्र ठरवण्याच्या लढ्यास यश–दत्ता काकडे, प्रा.ईश्वर मुंडे

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवणारे व्यक्तीस जात वैधता प्रमाणपत्र अधिनियम २००४ तरतुदीनुसार एक वर्षात सादर करणे आवश्यक असते. सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोट निवडणूक मध्ये राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच सदस्य यांनी जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच/ सदस्यांना अपात्र ठरवण्यात आले होते.**



या अपात्रतेच्या विरोधात राष्ट्रवादी कॉंग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे यांनी आ.जयंत पाटील यांच्या कडे ही माहिती सादर केली होती.आ.जयंत पाटील यांनी विधानसभेत व सरपंच परिषद मुंबई यांच्या वतीने राज्याध्यक्ष दत्ता काकडे यांनी आ.श्रीकांत भारतीय यांच्या मार्फत विधान परिषदेत आवाज उठवला होता. तसेच ग्राम विकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या कडे पाठपुरावा केल्यानंतर या पुढे एक वर्षाची मुदत वाढ देण्याची घोषणा विधानसभेत केली होती. त्या नुसार महाराष्ट्र शासनाने दि. १ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यानंतर आदेशाच्या प्रारंभीच्या दिनांकापर्यंत घेण्यात आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांच्या /सरपंचाच्या/ सभासदाच्या अध्यक्षांच्या आणि सदस्यांच्या व सभापतीच्या राखीव जागेवर निवडून आलेल्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदतवाढ या आदेशाच्या दिनांकपासून बारा महिन्याची मुदत शासन राजपत्र दि. ३०/०४/२०२५ अन्वये देण्यात आली त्या मुळे राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच/ सदस्यांना पात्र करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार या सरपंच व सदस्य यांनी आपला पदभार घेऊन कामकाज सुरू केले आहे. अखेर अपात्र ठरवलेल्या सरपंच सदस्य यांना पात्र करण्याच्या लढ्याला यश मिळाले असे मत सरपंच परिषद मुंबई चे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे व राष्ट्रवादीचे नेते प्राध्यापक ईश्वर मुंडे यांनी व्यक्त करून या लढ्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य करणा–या सर्वांचे आभार मानले आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखेचा जुगार अड्डावर छापा ११ आरोपीकडून ३४ लाखाचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

**पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांनी जालना जिल्ह्यातील जुगार अड्डावर कारवाई करण्याच्या सुचना दिल्या होत्या.**

त्या अनुषंगाने दिनांक २१/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना खब–या मार्फत गुंडेवाडी शिवारातील मधुकर निकाळजे याचे शेतामध्ये जुगार अड्डा सुरु असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सायंकाळी १९:३० वाजता तांदुळवाडी खुर्द शिवार गट नं. २७ मधील मधुकर मोहनराव निकाळजे यांचे शेतामध्ये चालु असलेल्या जुगार अड्ड्यावर अचानक छापा मारला आहे. त्याठिकाणी पत्र्याच्या शेडसमोर मोकळ्या जागेवर गोलाकार लावलेल्या टेबलावर १) नारायण



काळे रा. पोकळवडगाव ता. जालना २) संतोष काळे रा. संजयनगर देऊळगाव राजा जि. बुलडाणा ३) बाळु वाघमारे रा. पीर पिंपळगाव ता. जि. जालना ४) शेख ईस्माईल शेख इसा वय ४० वर्ष रा. पौर पिंपळगाव ता. जि. जालना ५) बबन मस्के रा. माळशेंद्रा ता.जि. जालना ६) राजन वाघमारे रा. खडकपुरा देऊळगाव राजा ७) गोरख आढे रा. मोहाडी तांडा ता.जि. जालना ८) जावेदखान मोहंमद खान वय ४५ वर्ष रा. गारखेडा सुतगिरणी छत्रपती संभाजीनगर ९) प्रकाश वाहुळे रा.दरेगाव ता.जि. जालना १०) संदीप चव्हाण रा. आडगावराजा जि. बुलडाणा ११) प्रदीपकुमार तांबिले रा. डोणगाव ता.जाफ्राबाद जि. जालना यांना ताब्यात घेण्यात आले असुन, त्यांचेकडील रोख रक्कम व जुगार साहित्य, तसेच घटनास्थळावरील वाहने असा एकूण ३४,०८,५२४/– रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपी विरुद्ध सपोनि. योगेश उबाळे, स्थानिक गुन्हे शाखा जालना यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे चंदनझिरा जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि.श्री. योगेश उबाळे, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, भाऊराव गायके, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, रुस्तुम जैवाळ, कैलास खाडे, प्रशांत लोखंडे, लक्ष्मीकांत आडेप, संभाजी तनपुरे, रमेश काळे, कैलास चेके, योगेश सहाने, धिरज भोसले, सोपान क्षीरसागर, अशोक जाधवर सर्व स्थागुशा जालना यांनी केली आहे.

# यशाने हुरळून आणि अपयशाने खच्चून न जाता मार्गक्रमण करावे–जयश्री विधाते

**बीड। प्रतिनिधी**

**ऋतुजा योगेश बावळे यांच्या प्रगती मेकअप स्टुडिओ आणि ब्युटी पार्लरचे उद्घाटन डॉ. सारीकाताई योगेश क्षीरसागर यांच्या शुभहस्ते झाले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बीड नगरपालिकेच्या मा. सभापती तथा नगरसेविका जयश्रीताई विलास विधाते, पत्रकार श्वेताताई घाडगे, ब्यूटिशियन तथा मेकअप आर्टिस्ट अंजलीताई जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. बावळे परिवारातील श्रीमती संगीताताई बावळे, अमृता बावळे, ऋतुजा बावळे, ज्ञानेश्वरीताई तांबे यांच्या हस्ते मान्यवरांचा यथोचित सन्मान**



करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या आयोजक मेकअप आर्टिस्ट ऋतुजाताई यांनी प्रास्ताविकात आजवरच्या वाटचालीचा आढावा घेतला. तर कार्यक्रमाच्या उद्घाटीका डॉ.सारीकाताई क्षीरसागर यांनी आपल्या बीड शहरात प्रामुख्याने महिला व्यावसाय म्हणून चालवत असलेल्या मेकअप स्टुडिओ आणि ब्युटी पार्लर मुळे लाखोंची उलाढाल होत असून अर्थ व्यवस्थेला चालना मिळत असल्या बद्दल समाधान व्यक्त केले. प्रमुख अतिथी विधातेताई यांनी आपल्या मनोगतात व्यावसायिक आणि व्यक्तिगत जीवनात यशाने हुरळून आणि अपयशाने खच्चून न जाता मार्गक्रमण करावे असे आवाहन केले तर पत्रकार श्वेताताईंनी प्रगती मेकअप स्टुडिओ आणि ब्युटीपार्लच्या नवीन शाखेचे उद्घाटन होत आहे या बद्दल आनंद केला. या कार्यक्रमाला परिसरातील महिला भगीनींनची उपस्थिती मोठ्याप्रमाणात लाभली होती.

## विविध मागण्यांसाठी वंचित चे 'जागरण गोंधळ आंदोलन'

**पाटोदा । प्रतिनिधी**

**तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्न, बोगस कामे, शासकीय योजनांमधील अपयश व प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या पाटोदा तालुकाच्या वतीने बुधवार ता. २६ रोजी 'जागरण गोंधळ आंदोलन' छेडण्यात येणार आहे. या आंदोलनाची सुरुवात सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटोदा येथून होणार असून, हा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकणार आहे.**

वंचित बहुजन आघाडी चे जिल्हाध्यक्ष,अजय सरवदे व जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांच्या नेतृत्वाखाली हे आदोलन पार पडणार असून शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर उतरणार आहेत. यामाध्यमातून पोटखराब झालेल्या जमिनींचे नियमितीकरण तातडीने करावे, शंभर चिरा ते सरकारी दवाखाना पाटोदा येथील बोगस रस्त्याची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत , प्रधानमंत्री व रमाई घरकुल योजनेचे हप्ते वेळेवर वितरित करावेत , संजय गांधी, श्रावण बाळ व निराधार योजना लाभार्थ्यांचे मानधन वेळेवर मिळावे , घरकुल लाभार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे ५ ब्रास वाळू विनामूल्य द्यावी, ग्रामसडक योजनेतील बोगस काम करणाऱ्या अभियंते व ठेकेदारांवर कारवाई करावी , सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बोगस रस्त्यांची चौकशी करून दोषींवर कार्यवाही करावी , पांदन रस्ते, बोगस विहिरी व दलित वस्तीतील कामांची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी यासह आदी मागण्या करण्यात येणार आहेत.

# शिवाजी पाटोळे यांचा सेवापूर्ती समारंभ सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रयोगशाळा सहाय्यक शिवाजी पाटोळे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सेवापुर्ती समारंभ सोहळा रविवारी संपन्न झाला.**

रविवार दि.२२ रोजी बीड येथे शिवाजी धोंडीराम पाटोळे यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए.एस. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब काकडे, शिक्षक नेते उत्तमराव पवार, गिरीश देशपांडे, अशोक जाधव, उमाकांत भद्रशेट्टी सुभाष क्षीरसागर, मुख्याध्यापक महादेव जाधव राजेंद्र कुऱ्हे, अभिषेक राऊत, सुरेश पेशकार , भाऊसाहेब देशमाने, प्रकाश राठोड यांची उपस्थिती होती. शिवाजी पाटोळे हे २९वर्ष १० महिन्याच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले त्यांनी सन १९९५ ते २००३ या कालावधीत सेवक, प्रयोगशाळा परिचर या पदावर सेवा केली सन २००६ मध्ये पाडळी हायस्कूल पाडळी येथे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर पदोन्नती मिळाली सन२०१८ पासून कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी येथे ३१ मे २०२५ पर्यंत सेवा करून सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कैलास पाटोळे, उत्तमराव पवार, गिरीष देशपांडे, अण्णासाहेब थिटे, नानासाहेब काकडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून पाटोळे यांना उदंड आणि निरोगी आयुष्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अजिंक्य चांदणे, सुभाष लोणके, विजय सरवदे, सहदेव खांडे, शिवाजी देवमाने, अविनाश वाघ, दत्तात्रय दुधाळ, प्रशांत सुलाखे यांच्यासह मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महिला–पुरुषांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. श्रीराम जाधव यांनी केले तर शेवटी पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## पान १ वरून...

### पाणी संचयात वाढ

सरासरी पाणीसाठा ३८ टक्क्याच्या जवळ गेला आहे. गेल्या वर्षी याच काळात ही टक्केवारी केवळ १७ टक्क्यांवर होती. म्हणजेच, यंदाच्या वर्षीचा जलसाठा जवळपास दुप्पट आहे. राज्यात एकूण २९९७ लहानमोठे जलप्रकल्प आहेत आणि त्यामध्ये मिळून सध्या ३८ टक्के पाणी आहे. मध्यम प्रकल्पांमध्येही यंदा ४२.७४ टक्के जलसाठा आहे. जो गतवर्षीपेक्षा खूपच जास्त आहे. लघु प्रकल्पांमध्ये सध्या ३३.२७ टक्के पाणीसाठा आहे, तर गेल्यावर्षी तो फक्त २४.०९ टक्क्यांवर होता. नागपूरसारख्या विभागांमध्ये मात्र पावसाचा काहीसा ओढा राहिल्याचे दिसून येत आहे. तिथे ३८३ धरणांमध्ये सध्या ३१.६१ टक्के पाणी आहे, जे गेल्या वर्षीच्या ३५.७० टक्क्यांपेक्षा थोडे कमी आहे. अमरावती विभागात मात्र पावसाने चांगली साथ दिली असून, तिथे २६४ धरणांत ३९.०६ टक्के पाणीसाठा आहे. याच्या तुलनेत गेल्या वर्षी ही टक्केवारी ३६.८१ इतकी होती. कोकण विभाग नेहमीच पावसाळ्यात अग्रेसर असतो आणि यंदाही अपवाद नाही. तिथे १७३ धरणांमध्ये ४४.५३ टक्के जलसाठा असून, गेल्या वर्षीच्या २८.९६ टक्क्यांच्या तुलनेत ही स्थिती खूपच समाधानकारक आहे.

--------------

### मराठवाड्यातील उपयुक्त पाणीसाठा

आहे. मांजरा प्रकल्पात ३.४१२ टीएमसी एकूण पाणीसाठा असून, त्यापैकी १.७५ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. पेनगंगा प्रकल्पात २५.८२८ टीएमसी एकूण पाणीसाठा असून, त्यापैकी १४.७१ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. मानार प्रकल्पात २.८१० टीएमसी एकूण पाणीसाठा झाला असून, त्यापैकी २.५० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. प्रकल्पात ३.३१९ टीएमसी एकूण पाणीसाठा झाला असून त्यापैकी २.२६ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. निम्न तेरणा प्रकल्पात ०.७७३ टीएमसी एकूण पाणीसाठा झाला असून, त्यापैकी ०.६८ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. सीना कोळेगाव प्रकल्पात ३.४५७ टीएमसी एकूण पाणीसाठा झाला असून, त्यापैकी १.३० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

--------

### शिवसेना हायजॅक करण्याचा

निवडणुकांमध्येही तसाच सामना रंगणार आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बाजू खासदार संजय राऊत दररोज माध्यमांतून मांडतात. शिवसेना सोडून गेलेल्यांना ते गद्दार म्हणतात, मात्र संजय राऊत हेच सर्वात आधी फुटणार होते. शिवसेना हायजॅक करायचा प्रस्ताव संजय राऊतांनीच अगोदर मांडला होता, असा खळबळजनक दावा राज्याचे मंत्री आणि शिंदेंच्या शिवसेनेतील वरिष्ठ नेते गुलाबराव पाटील यांनी केला आहे.

----------

### वाल्मिक कराडची

मधुमेह आणि रक्तदाबाचा त्रास जाणवत होता. पण त्याला रुग्णालयात दाखल करण्याची गरज नसल्याचे वैद्यकीय पथकाने सांगितले. जेलमध्ये असताना वाल्मिक कराडने अनेकदा प्रकृती ठीक नसल्याचे कारण दिले आहे. यातच शनिवारी पुन्हा एकदा कारागृहात वाल्मिक कराडची प्रकृती बिघडल्याचे वृत्त समोर आले होते. याशिवाय वाल्मिक कराड याला तुरुंगात व्हिआयपी ट्रिटमेंट मिळत असल्याचा आरोप निलंबित पीएसआय रणजित कासले यांनी केला होता. दरम्यान, बीडमधील विशेष मोक्का न्यायालयात सुनावणी सुरू आहे. ३ जूनला झालेल्या सुनावणीवेळी वाल्मिक कराडच्या डिस्चार्ज अर्जावर युक्तिवाद झाला. पण न्यायालयाने त्याचा अर्ज फेटाळून लावला. माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय म्हणून वाल्मिक कराडला ओळखले जाते. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर मुंडे यांच्यावर मंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी दबाव होता. त्यानंतर त्यांनी प्रकृतीचे कारण देत मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

-------------

### अहमदाबाद विमान

या अपघातात २६५ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर नऊ दिवसांनी नागरी वमिान वाहतूक महासंचालनालयाने कठोर भूमिका घेतली आहे. या दुर्घटनेसाठी एअर इंडियाच्या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना निष्काळजीपणाचा दोषी ठरवण्यात आले आहे. या तिघांना बडतर्फ करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यांना क्रू शेड्यूलिंग आणि रोस्टरिंगशी संबंधित जबाबदाऱ्यांपासून दूर करण्याचे आदेश देण्यात आले. या तिघांमध्ये पायल अरोरा (क्रू शेड्युलिंग–प्लॅनिंग), पिंकी मित्तल (चीफ मॅनेजर, क्रू शेड्युलिंग) त्यापैकी सर्वात मोठे नाव म्हणजे चुरा सिंग, जे एअर इंडियाचे विभागीय उपाध्यक्ष आहेत. डीजीसीएने म्हटले की, एअर इंडियाने क्रू शेड्यूलिंगमध्ये वारंवार गंभीर उल्लंघन करण्यात आले. जसे की अनधिकृत क्रू पेअरिंग, परवाना नियमांकडे दुर्लक्ष करणे आणि क्रू विश्रांती आणि नवीनतेचे आवश्यकतांचे पालन न करणे, या स्वरुपाच्या चुका या तीन अधिकाऱ्यांनी केल्या आहेत.

------------

### निवडणूक आयोगाचा निर्णय

कालावधीत बदल केला आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार आता एक वर्षाऐवजी केवळ ४५ दिवसांपर्यंत निवडणुकीचे फुटेज आणि फोटो संग्रहित ठेवले जाणार आहेत. मतदानाचा निकाल जाहीर झाल्यानंतर हा कालावधी लागू होईल आणि या काळात कोणतीही निवडणुकीशी संबंधित याचिका दाखल केली नाही, तर डेटा नष्ट होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे विरोधक आक्रमक झाले असून वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनीही आता निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, १६ जानेवारी २०२५ रोजी मी मल्लिकार्जुन खर्गे आणि इतर राजकीय नेत्यांना लिहिलेल्या पत्रात महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत ७५,९७,०६७ मतांची वाढ आणि निवडणूक नियम १९६१ मध्ये केलेल्या सुधारणांबद्दल चिंता व्यक्त केली होती. परंतु कॉंग्रेस किंवा इतर पक्षांनी माझ्या सूचनांकडे कोणीही गांभीर्याने लक्ष दिले नाही. परंतु माझ्या सर्व शंका आज प्रत्यक्षात आल्या आहेत. चेतन चंद्रकांत अहिरे विरुद्ध युनियन ऑफ इंडिया अँड ऑरस या खटल्याची पुढील सुनावणी सोमवार, २३ जून रोजी मुंबई उच्च न्यायालयात होणार आहे. याप्रकरणी उच्च न्यायालयाने याआधी निवडणूक आयोगाला न्यायालयात उत्तर द्यायला सांगितले होते, असे त्यांनी म्हटले आहे.

--------------

### पालख्यांमुळे

का केल्या जात आहेत. उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तर रस्त्यावर नमाज पठण करणाऱ्याचा पासपोर्ट रद्द करू अशी धमकी दिली आहे, असेही आ. आझमी म्हणाले. दरम्यान, शरद पवार एक मोठे नेते आहेत. शरद पवार यांची ज्यांनी साथ सोडली ते केवळ ईडी आणि इन्कम टॅक्स यांच्यामुळे सोडली आहे, असेही ते म्हणाले. राज उद्धव एकत्र आले तर शिवसेनेची ताकद कमी होऊ शकते. दोघा भावांची ताकद आणि दोघांमधली दिवार ह्या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एकाच घरात जन्माला आले आहेत, त्यांनी एकसाथ राहावे. त्यात आम्हालाही आनंद आहे. राज ठाकरेंची काही ताकद नाही ते फक्त द्वेषाचे राजकारण करतात. दररोज हिंदी किंवा उत्तर भारतीयांविरोधात बोलणे हेच राज ठाकरेंचे काम आहे, असेही आझमी म्हणाले. आझमी म्हणाले, भाषेसाठी संसदेत एक कमिटी आहे. ४५ मेंबर आहेत. ते भारतभर जाऊन हिंदीतून काम करण्यासाठी प्रोत्साहित करतात. केंद्र सरकारचे पूर्ण काम हिंदीतून असतं. महाराष्ट्रात जर तीन भाषा असतील तर सगळ्यात पहिल्यांदा मराठी असली पाहिजे. दुसरी भाषा हिंदी आणि त्यानंतर इंग्लिश असायला पाहिजे. महाराष्ट्र जर तिसरी भाषा हिंदी नसेल तर तुम्हीच सांगा कोणती भाषा पाहिजे.

------------

### पंढरपुरात सलग १० दिवस

ठेवण्याची मागणी करत होते. अखेर त्यांच्या या मागणीला यश आले आहे. यंदा प्रथमच आषाढी वारीच्या इतिहासात यात्रा कालावधीतील सलग १० दिवस पंढरपुरातील मास मटन विक्रीस बंदी करण्यात आली आहे, याबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी माहिती दिली आहे. त्यांनी यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत.

-------------

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २३ जून २०२५


## विज्ञान शिक्षक आणि प्रयोगशाळा सहाय्यक यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मराठी विज्ञान परिषद मुंबई, पू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र आणि मराठी विज्ञान परिषद अंबाजोगाई विभाग व गटशिक्षण कार्यालय अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्रात विज्ञान शिक्षक आणि प्रयोगशाळा सहाय्यक यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. ही कार्यशाळा दि. ०३,०४ व ०५ जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०५ या कालावधीत संपन्न होणार आहे. या कार्यशाळेस मार्गदर्शन करण्यासाठी मराठी विज्ञान परिषद, मुंबई येथून विज्ञान अभ्यासक व तज्ञ व्यक्ति मार्गदर्शन करणार आहेत. यातून विज्ञान शिक्षक व सहाय्यक यांच्या साठी अवघड प्रयोगांची मांडणी,साहित्य सूची, भौतिकशास्त्र व रसायनशास्त्रतील उपकरणे हाताळणी व निगा यांचे सखोल मार्गदर्शन लाभणार आहे.प्रयोगशाळा सुरक्षा,अग्नि सुरक्षा, रसायन व भौतिकशास्त्रांचा परिचय जीवशास्त्र नमुने व निरीक्षण या विषयावर सांगोपांग चर्चा होणार आहे. एकूणच विज्ञान पूरक संकल्पना, मांडणी व विवेचन या विषयावर मार्गदर्शक आपली मते मांडणार आहेत.

# आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनात शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित सहभागी व्हावे

## बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीचे आवाहन!

बीड । प्रतिनिधी

विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याचे अनुदानासाठी निधीची तरतूद उपलब्ध करून द्या या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने दिनांक ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी व आपल्या हक्काचा टप्पा वाढीचा निधी पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले आहे.

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्याच्या वेतनासाठी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी तात्कालीन राज्य सरकारने



धोरणात्मक निर्णय घेऊन या संदर्भातला शासननिर्णय ही काढला होता. दरम्यान निवडणुका होऊन पुन्हा शिवसेना भाजपाचे सरकार सत्तेत आले. या नवीन सरकारच्या विधिमंडळाची दोन अधिवेशन पार पडली, परंतु या अधिवेशना दरम्यान वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद मात्र झाली नाही. त्यामुळे हजारो शिक्षकांचा हिरमोड झाला. परंतु सरकारने आमचा, आमच्या वयाचा, आमच्या सेवेचा आमच्या घरांचा आणि घरातली व्यक्तींचा विचार करून आमच्या पुढील वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करावी या मागणीसाठी विनाअनुदानित शिक्षकांसाठी कार्यरत असणारी मातृ संघटना महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीने ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा १८ वा दिवस आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या हक्काचे वेतन पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष

श्री आत्माराम वाव्हळ सर, जिल्हा कार्याध्यक्ष श्री. प्रताप पवार सर,उपाध्यक्ष श्री. रामदास जामकर सर ,उपाध्यक्ष श्री. अरविंद सौंदलकर सर,जिल्हा सचिव श्री. शेख सर जिल्हा संघटक

प्रताप देशमुख सर,जिल्हा सहसंघटक श्री. बाळासाहेब नागरगोजे सर, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे मॅडम, महिला सचिव

सुरेखा गायकवाड मॅडम बीड तालुका अध्यक्ष श्री. भागवत यादव सर,गेवराई तालुका अध्यक्ष श्री. दीपक गरूड सर, आष्टी तालुका अध्यक्ष श्री. रविंद्र भुकन सर,पाटोदा तालुका अध्यक्ष श्री. अंकुश गवळी सर,शिरूर तालुका अध्यक्ष

श्री. दशरथ साबळे सर,माजलगाव तालुका अध्यक्ष श्री. चंद्रशेखर तौर सर, वडवणी तालुका अध्यक्ष श्री. वैजनाथ शिंदे सर,परळी तालुका अध्यक्ष श्री गोविंद आघाव सर , धारूर तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर मुंडे यांच्या सह जिल्हा विविध पदाधिकारी यांनी केले आहे.

## अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळुन महावितरण कर्मचाऱ्याची आत्महत्या

जालना । प्रतिनिधी

विज वीतरण कंपनीत कार्यरत संजय बाबुराव ढिलपे यांनी वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळुन शनिवारी राहत्या घरात गळफास घेवुन आत्महत्या केली. संतप्त नातेवाईकांनी कदीम जालना पोलीस ठाणे गाठून संबंधितांवर कारवाईची मागणी करीत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार न करण्याचा पावित्रा घेतल्यामुळे तणाव निर्माण झाला होता.



यावेळी दिलेल्या निवेदनात मयत संजय ढिलपे यांच्या पत्नी सविता ढिलपे आणि मुले आशिष व सुमित ढिलपे यांनी म्हटले आहे की, संजय ढिलपे हे विज वितरण कंपनीच्या मस्तगड येथील कार्यालयात कार्यरत होते. मध्यंतरी बायपास शस्त्रक्रिया झाल्यापासून ते २-३ वर्षापासून सतत अजारी रहायचे. त्यांना अनेकवेळा कामावर जात येत नसल्याने ते रजा घ्यायचे. अशातच त्यांची बदली आष्टी (ता. परतूर) येथे करण्यात आली होती. मात्र, आजारी असल्याने आष्टी येथे जाणे शक्य नसल्याचे त्यांनी वरिष्ठांना कळविले होते. मात्र, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नाही. त्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रकृतीचा कुठलाही विचार न करता त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई केली. सन २०२४ पासुन त्यांना कामावर घेतले जात नव्हते. संबंधीत अधिकाऱ्यांमुळे आमच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आली होती. त्यातुनच आलेले नैराश्यामुळे वैफल्यग्रस्त होवून शनिवारी दुपारी संजय ढिलपे यांनी गळफास घेवुन आत्महत्या केली आहे.त्यामुळे महावितरणचे कार्यकारी अभियंता , कनिष्ठ सहाय्यक अभियंता , कनिष्ठ अभियंता व रांजणी शाखेचे एक कर्मचारी असे हे सर्व अधिकारी आत्महत्येला जबाबदार असल्याने त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी आणि मयत संजय ढिलपे यांच्या बडतर्फीचा आदेश तात्काळ रद्द करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.




**मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित शताब्दी महोत्सव कार्यक्रमात केंद्रीय गृहमं श्री. अमित शहा यांच्या हस्ते जालना जिल्ह्यातील स्टील असोसिएशनचे अध्यक्ष तथा कालिंक स्टीलचे संचालक घनश्यामदास गोयल यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळ मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री आशिष शेलार दिसत आहेत.**

# शिवाजी पाटोळे यांचा सेवापूर्ती समारंभ सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रयोगशाळा सहाय्यक शिवाजी पाटोळे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सेवापुर्ती समारंभ सोहळा रविवारी संपन्न झाला.

रविवार दि.२२ रोजी बीड येथे शिवाजी धोंडीराम पाटोळे यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए.एस. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब



काकडे, शिक्षक नेते उत्तमराव पवार, गिरीश देशपांडे, अशोक जाधव, उमाकांत भद्रशेट्टी सुभाष क्षीरसागर, मुख्याध्यापक महादेव जाधव राजेंद्र कुऱ्हे, अभिषेक राऊत, सुरेश पेशकार , भाऊसाहेब देशमाने, प्रकाश राठोड यांची उपस्थिती होती. शिवाजी पाटोळे हे २९वर्ष १० महिन्याच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले त्यांनी सन १९९५ ते २००३ या कालावधीत सेवक, प्रयोगशाळा परिचर या पदावर सेवा केली सन २००६ मध्ये पाडळी हायस्कूल पाडळी येथे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर पदोन्नती मिळाली सन२०१८ पासून कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी येथे ३१ मे २०२५ पर्यंत सेवा करून सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कैलास पाटोळे, उत्तमराव पवार, गिरीष देशपांडे, अण्णासाहेब थिटे, नानासाहेब काकडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून पाटोळे यांना उदंड आणि निरोगी आयुष्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अजिंक्य चांदणे, सुभाष लोणके, विजय सरवदे, सहदेव खांडे, शिवाजी देवमाने, अविनाश वाघ, दत्तात्रय दुधाळ, प्रशांत सुलाखे यांच्यासह मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महिला-पुरुषांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. श्रीराम जाधव यांनी केले तर शेवटी पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## तंत्रशिक्षणात योगेश्वरी महाराष्ट्रात अग्रेसर : योगेश्वरी पॉलिटेक्निकमधील

# २० विद्यार्थ्यांनी मिळवले १०० पैकी १०० गुण

अंबाजोगाई । प्रतिनिधीः

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अभियांत्रिकी पदविका उन्हाळी सत्र परीक्षा-२०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून अंबाजोगाई येथे शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांनी संस्थेचे नाव महाराष्ट्रात उज्वल केले आहे.




यामध्ये एकूण २० विध्यार्थ्यांनी अतिशय अवघड समजल्या जाणाऱ्या गणित विषयात पैकीच्या पैकी गुण मिळवले आहेत. त्यामध्ये वेदांत जोशी, सौदागर बडे, पायल साळुंके,ऋतुजा पांचाळ, स्वाती होळकर, सोनाली कुलकर्णी, ज्ञानेश कुलकर्णी,शुभांगी वाकडकर, शिवांजली स्वामी, सृष्टी आवाड, आदिती माळी, पंकजा लव्हारे, धनश्री देशमुख, सायली देशमुख, हर्षदा शिंदे, योगेश्वरी खाडप, अमृता मोगले,तेजस्वि घोरपडे,रेवती काळे, आर्या मिश्रा यांनी गणित विषयात पैकीच्या पैकी गुण मिळवून महाराष्ट्रात सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. तसेच एकूण ४७ विध्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत . या विद्यार्थ्यांना गणित विषयासाठी प्रा.नारायण सिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशामागे विभागप्रमुख प्रा. रोहित कदम, प्रा.नारायण सिरसाट, प्रा.अतुल फड, प्रा.श्याम गडदे प्रा. बप्पासाहेब सोनवणे व सर्व शिक्षकीय कर्मचा-यांनी मेहनत घेतली. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष श्री .गणपत व्यास, का. उपाध्यक्ष ॲड. जगदीश चौसाळकर, सचिव श्री कमलाकरराव चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ. शैलेश वैद्य, संचालक श्री.प्रताप पवार यांनी अभिनंदन केले आहे. अशी माहिती कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे यांनी दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने तंत्रशिक्षीत होऊन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे नाव महाराष्ट्रात उज्वल करत असून, मी सर्व संचालकांच्या वतीने सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व तंत्रनिकेतनच्या शिक्षक वर्गाचे अभिनंदन करतो.

पान ६ वरून...

### लोखंडी सावरगाव

भेट घेऊन पुन्हा एकदा हा मुद्दा सविस्तर मांडला. या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश आले असून रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांनी २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात लोखंडी सावरगाव ते बर्दापूर या महामार्गाच्या १८ किमी लांबीच्या टप्प्याच्या चौपदरीकरणाचा समावेश अधिकृतरीत्या केला आहे. या कामासाठी सुमारे २५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

या निर्णयामुळे बर्दापूरच्या पुढे अचानक दोन पदरी होणाऱ्या रस्त्यामुळे निर्माण होणाऱ्या अपघातांची साखळी खंडीत होईल. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना आता सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास अनुभवता येणार आहे. या निर्णयाबद्दल आमदार नमिता मुंदडा यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष आभार मानले असून हा निर्णय प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, या निर्णयाबद्दल नागरिकांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. रस्त्याचे काम नियोजित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा आता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### सामाजिक स्वास्थसाठी

मदत होईल.आपल्या भारत देशाला ऋषी मुनी पासून योगासनाची परंपरा लाभलेली आहे. तथागत गौतम बुद्ध, रामदेव बाबा, यांनी योगासने करून भारत देशाला,व संपूर्ण जगाला योग साधना दिली . तसेच विद्यार्थिनी शालेय जीवना त क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन नावलौकिक करावे असे सांगितले. यावेळी विद्यालयाचे सहशिक्षक निकाळजे आर. एस. पन्हाळकर ए बी.,कुलांगे,श्रीमती देशमुख के एम. श्रीमती पालवे एस आर. इत्यादी शिक्षक कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अनुलोमिलन, कपालभाती, शीर्षासन, वज्रासन , ताडासन, भुजंगासन, चक्रासन, नौकासन, इत्यादी योगासनाचे प्रकार अनारसे आर एच. यांनी विद्यार्थ्यांना करून दाखवले.

### राशनच्या कट्ट्यात

घेतले आहे.. तुम्ही देणार नसाल तर ते नेमके कुठे गेले आहे..? असा सवाल केला व संबंधितांची तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तक्रार व्हॉटस ऑपवरुन केली, तहसीलदार व उपविभागीय अधिकारी याकडे गांभीर्याने पाहून सामान्य गावकऱ्यांना न्याय देतील का असा प्रश्न उपस्थित झाला असून संबंधित अधिकारी श्री विकास बळवंत यांच्यावर नेमकी काय कार्यवाही होणार की पुन्हा सालो साल राशन का माल, गिरफ्तार करेंगे लाल, और गरीबोंका ही होगा हाल..

### चौसाळा येथे परशुराम

करण्यात आली ॲड कीर्ती जोशी यांची तालुका महिला आघाडी अध्यक्ष पदी निवड करण्यात आली तसेच यावेळी सर्व कार्यकारणी देखील घोषित करण्यात आली यामध्ये मिलिंद सर्वज्ञ यांना चौसाळा सर्कल अध्यक्ष तर राहुल देशमुख मिलिंद कुलकर्णी उपाध्यक्ष सोशल मीडिया प्रमुख म्हणून अमोल शेटे तर सर्कल सचिव म्हणून यांची निवड करण्यात आली बहुभाषिक ब्राह्मण संघटनेचे अध्यक्ष अनंत देशमुख हे होते तर

परशुराम हिंदू सेवा संघाचे संस्थापक प्रदेशअध्यक्ष विश्वजीत देशपांडे विनायक रत्नपारखी महाराष्ट्र सरचिटणीस आनंद कुलकर्णी मराठवाडा अध्यक्ष भगवान पाटील साहेब प्रदेश उपाध्यक्ष शैलेश खोपटीकर पुणे शहर अध्यक्ष तसेच अमृतचे सहसंयोजक दिगंबर जोशी यावेळी कार्यक्रमाचे मार्गदर्शक मधुकर सर मार्गदर्शक राम सर्वज्ञ अमोल देशमुख खडकीकर तसेच पोलीस पाटील रवींद्र देशमुख खडकीकर अनेक मान्यवर उपस्थित होते उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रसाद देशमुख यांनी केले तर मधुकर पोतरकर कालिदास देशमुख भगवान पाटील आनंद कुलकर्णी विनायक रत्नपारखी व विश्वदीश देशपांडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच अमृत विषयी व परशुराम विकास महामंडळ विषयी मोलाचे मार्गदर्शन झाले विश्वजीत देशपांडे यांनी तरुणांना नोकरीपेक्षा उद्योगाकडे वळा असा मोलाचा सल्ला दिला व खास करून व ब्राह्मण समाजातील मुलीचे लग्न करताना नोकरीवाला शोधण्यापेक्षा चांगला व्यावसायिक जावई बघा असे मार्गदर्शन विश्वजीत देशपांडे यांनी केले हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी अभीर देशमुख सुंदर भांड रंजीत भांड शिवा कुलकर्णी मिलिंद पोतरकर विनोद गोसावी मंदार कुलकर्णी द्वारकाधीश देशमुख रुपेश शेटे शुभांगी सर्वज्ञ डॉक्टर अनिता पोथरकर सुनिता कुलकर्णी विद्या देशमुख जान्हवी सर्वज्ञ सुरेखा सर्वज्ञ योगिता सर्वज्ञ तसेच पंचक्रोशीतील अनेक मान्यवर समाजबांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमेश प्रसाद देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन विकास सर्वज्ञ यांनी केले.

### शारीरीक आणि आत्मिक

अधीक्षक नवनीत कॉवत म्हणाले की, संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. पाच हजार वर्षांपासून अधिकच परंपरा असणारी योग विद्या ही भारताने जगाला दिलेली देणगी असून व्यक्तीच्या शारीरिक आणि आत्मिक विकासासाठी योग विद्या सहाय्यभूत ठरते. योगामुळे शरीर निरोगी आणि मन शांत राहते. आजच्या आधुनिक धकाधकीच्या काळात काम करत असताना पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मोठा ताणतणाव असतो. तणावमुक्त जीवनासाठी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दररोज कमीत कमी अर्धा तास आणि जास्तीत जास्त एक तास योगाला द्यावा असे सांगितले.योग प्रशिक्षण डॉ. संजय तांदळे यांनी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवत योगाचे फायदे आणि सविस्तर माहिती दिली. या वेळी बोलताना डॉ. संजय तांदळे म्हणाले की, वर्षाचे ३६५ दिवस रोज सकाळी उठून योगा करणे आपल्या शरीरासाठी खूप अत्यावश्यक आहे. त्यामुळे आपले शरीर मन निरोगी राहते. म्हणून प्रत्येक व्यक्तीने शरीर व मन सुदृढ करायचे असेल तर योग हा सर्वोत्तम पर्याय असल्याचे डॉ संजय तांदळे यांनी सांगितले. योग शिबिराच्या शेवटी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी योग प्रशिक्षक डॉ. संजय तांदळे ,भारत ठोंबरे व राजकुमार मोरे यांचा शाल, रोपटे व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. योगा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार पोलीस कल्याण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापुरे यांनी केले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक उमाशंकर कस्तुरे ,राखीव पोलीस निरीक्षक दलाई साहेब सह पोलीस अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून

### परभणी ते पंढरपूर

असून ते आपले कर्तव्य बजावत हा सायकल रायडर्स ग्रुप चालवत असल्याचे सांगितले. आजच्या परिस्थितीत सर्वत्र प्रदूषण जोमाने पसरले जात असून आपल्या सायकल रायडिंग द्वारे प्रदूषण रोखण्यासाठी जनजागृती करत असल्याचे देखील रापतवार यांनी नमूद केले.यावेळी गटशिक्षण कार्यालयाच्या वतीने सुवर्णकार साहेब यांनी नवभारत साक्षरता अभियाना अंतर्गत सर्व सायकल स्वारांनी या सायकलवारीत येणाऱ्या गावागावात साक्षरते विषयी जनजागृती निर्माण करावी असे आवाहन केले. प्रमुख पाहुणे राम घोडके , तालुका क्रिडा समन्वयक दत्ता देवकते आणी संतोष कदम यांनी समायोजित मनोगत व्यक्त केले.प्रभावती डेली रायडर्स ग्रुप परभणीचे अध्यक्ष दिपक तळेकर यांनी आपल्या या डेली सायकल ग्रुप विषयी माहिती दिली. त्यांच्या या ग्रुप मधील अनेक सदस्यांनी सायकलवर हजारो किलोमीटरचा प्रवास केला असून त्यांनी दोन धाम, चार धाम, गड किल्ल्याची परिक्रमा संपूर्ण केल्याचे तळेकर यांनी सांगितले. त्यांच्या या ग्रुपमध्ये चौदा वर्षाचा सायकल रायडर चि तेजस हा विद्यार्थी देखील सहभागी असल्याचे यावेळी दिसून आले. या कार्यक्रमात संपूर्ण प्रभावती सायकल रायडर्स ग्रुपचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करून त्यांना अल्पोपहार वितरित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक मैत्रीचे महेश पवार संदीप दरवेशवार,सुनील व्यवहारे,रमेश सुरेवार, सय्यद अमजद,अजय रापतवार, रोशन लाड,सनी लखेरा यांनी परिश्रम घेतले.

cmyk




# कापूस उत्पादकांसाठी भावांतर योजना राबवा

## कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाकडून (सीएआय) मागणी

पुणे : केंद्र सरकारने कापसाच्या हमीभावात वाढ केली. मात्र कमी मागणी आणि आंतरराष्ट्रीय बाजारात मंदी यामुळे बाजारभाव दबावात आहेत. तरीही इतर देशांच्या तुलनेत भारतातील भाव जास्त आहेत. त्यामुळे भारताची कापूस निर्यात स्पर्धात्मक राहिलेली नाही. यावर तोडगा काढण्यासाठी सरकारने कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी भावांतर योजना राबवावी, अशी मागणी कापूस उद्योगाची शिखर संघटना असलेल्या कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाने (सीएआय) केली आहे.

मागील वर्षभर कापसाचे दर हमीभावाच्या खालीच राहिले. आंतरराष्ट्रीय बाजारातही कापसाच्या भावात नरमाई आहे. देशात कापूस आयातीवर ११ टक्के शुल्क असतानाही आयात पडतळ असल्याचे आयातदार सांगत आहेत. त्यामुळे कापसाचा हमीभाव आणि बाजारभाव याचा मेळ बसताना दिसत नाही. त्यामुळे सीसीआयला चालू हंगामात विक्रमी १०० लाख गाठी कापूस खरेदी करावा लागला. मात्र, जे शेतकरी सीसीआयला कापूस विकू शकले नाहीत, त्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले. शेतकऱ्यांना हमीभाव मिळाल्याशिवाय ते कापसाचे उत्पादन




घेणार नाहीत. मात्र, या कापसाचा वापर करणारा उद्योगही देशातील जास्त भावामुळे अडचणीत आला आहे. सीसीआयने कापसाची खरेदी केली आणि सीसीआय आता आंतरराष्ट्रीय बाजारातील दरापेक्षा अधिक भावात कापसाची विक्री करत आहे. देशात कापसाचे भाव जास्त असल्याने या भावात सूत आणि कापड तयार करून निर्यात करणे शक्य होत नाही. निर्यातीच्या स्पर्धेत भारत मागे पडत आहे, असे उद्योगांचे म्हणणे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभावही मिळावा आणि उद्योगांना आंतरराष्ट्रीय बाजारभावाने कापूसही मिळावा, यासाठी सरकारने कापसासाठी भावांतर योजना राबवावी, अशी मागणी सीएआयने केली आहे. सीएआयचे अध्यक्ष अतूल गणात्रा म्हणाले, की सरकारने नुकतीच कापसाच्या हमीभावात वाढ केली. मध्यम लांब धाग्याच्या कापसाचा हमीभाव ७१२१ रुपयांवरून ७७१० रुपये केला आहे. तर लांब धाग्याच्या कापसाचा हमीभाव ७५२१ रुपयांवरून ८११० रुपयांपर्यंत वाढवला. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारात आणि देशातील बाजारात कापसाचे भाव कमी आहेत. हमीभावामुळे उद्योगांच्या अडचणी वाढत आहेत. उद्योगांच्या सूत आणि कापड निर्मितीचा खर्च वाढला आहे. त्यामुळे जागतिक स्पर्धेतून भारत बाहेर फेकला जात आहे. यामुळे कापसाची संपूर्ण मूल्यसाखळीच अडचणीत येत आहे. या परिस्थितीवर तोडगा काढणे गरजेचे आहे. पण हा तोडगा काढताना शेतकऱ्यांना हमीभाव मिळाला पाहिजे, याची खबरदारी घेतली पाहिजे.

### शेतकऱ्यांना खुल्या बाजारात विक्री करू द्या

श्री. गणात्रा म्हणाले, ''सरकारने दरवर्षी हमीभाव जाहीर करावा. मात्र सीसीआयकडून खरेदी न करता शेतकऱ्यांना खुल्या बाजारात कापसाची विक्री करू द्यावी. शेतकऱ्यांना बाजारात जो भाव मिळेल तो भाव आणि हमीभाव यातील फरक सरकारने शेतकऱ्यांना द्यावा. यामुळे वाढलेला हमीभाव शेतकऱ्यांना मिळेल आणि उद्योगांनाही बाजारभावात कापूस मिळेल.''

# सूक्ष्म सिंचनासाठी अनुदान प्रक्रिया



राज्यातील शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत राबवण्यात येणारी ''प्रति थेंब अधिक पीक'' ही सूक्ष्म सिंचन योजना आता अधिक प्रभावी आणि शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरत आहे. उत्पादन वाढवण्यासाठी पाण्याचा प्रभावी वापर करणाऱ्या या योजनेमुळे आता शेतकऱ्यांना मिळणार आहे ९०% पर्यंत थेट खात्यात अनुदान.या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे ''प्रति थेंब अधिक पीक'' हा तत्त्वज्ञान वापरून पाण्याची बचत करणे, उत्पादन वाढवणे आणि खर्च कमी करणे. मात्र फक्त ५ हेक्टरपर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे. ही योजना शेतकऱ्यांना पाण्याचा कार्यक्षम वापर, खर्च कमी आणि उत्पादन वाढ यासाठी मदत करते. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी ही संधी नक्कीच साधावी.

योजनेची वैशिष्ट्ये :२५% ते ९०% पर्यंत अनुदान. एस-एसी प्रवर्गासाठी ९०% अनुदान. भूधारक शेतकऱ्यांना ५५%, बहुभूधारकांना ४५% अनुदान.

पूरक योजना :मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना (२५% ते ३०% पूरक अनुदान). अनुसूचित जातीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना. अनुसूचित जमातीसाठी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना.

अर्ज करण्याची प्रक्रिया :अर्ज महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन करावा लागतो. निवड संगणकीकृत लॉटरी पद्धतीने केली जाते. निवड झालेल्या शेतकऱ्यांना एसएमएस द्वारे सूचना मिळते. नंतर अधिकृत वितरकाकडून संच खरेदी करावा लागतो. कृषी पर्यवेक्षक पाहणी करून थेट अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करतो.

खर्च किती येतो :भाजीपाला व पिकाच्या प्रकारावर अवलंबून खर्च वेगळा असतो. सरासरी प्रति हेक्टर ६ ते १० लाख खर्च अपेक्षित असतो.

आवश्यक कागदपत्रे :सातबारा उतारा व ८ अ उतारा. आधारकार्ड. बँक पासबुक. फार्मर आयडी.सिंचन साधनांची नोंद सातबारावर (नसेल तर स्वयंघोषणापत्र आवश्यक)मार्गदर्शनासाठी संपर्क करा :जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, कृषी सहायक, सीएससी केंद्र.

# भोपळा वर्गीय भाज्यांवरील कीटक, रोग अन् त्याचे नियंत्रण

भोपळा वर्गीय भाजीपाला विचारात घेतला की, समोर भोपळ्यासारख्या गोल भाज्या येतात. भोपळा वर्गीय भाजीपाला प्रामुख्याने भोपळा, तिखट, लौकी, काकडी, लुफा, पेठा, पडवळ आणि काकडी इत्यादी. या भाज्यांना विविध रोगांचा सामना करावी लागतो.

लाल भोपळा बीटल :या लाल रंगाच्या झाडाची पाने लवकर टप्प्यात खाल्ल्याने नष्ट होते, त्यामुळे पिकाची वाढ थांबते. जैविक नियंत्रण कारण्यासाठी अर्धा कप लाकूड राख आणि अर्धा कप मिसळा आणि निवडले की अर्धा कप लिटर पाण्यात काही तास सोडा. शेतात फवारणीपूर्वी काही संक्रमित पिकावर फवारणी करावी. दुसरा पर्याय म्हणून, ५% एनएस साबणाने मिसळला जाऊ शकतो आणि ७ दिवसांच्या अंतराने वापरला जाऊ शकतो.



फळांची माशी : फळांची माशी ही मादी कीटक फळांच्या आत अंडी घालते, नंतर अळ्या हळूहळू फळात बोगदा बनवितात आणि लगदा खाण्यास सुरवात करतात, ज्यामुळे फळ सडणे, विकृत होणे व चालू होते. यावर प्रतिबंध करताना शेतातील तण नष्ट करा. मक्याची काढणी चारी बाजूंनी करावी कारण माशीला उंच ठिकाणी बसायला आवडते. ज्यावर मालाथिऑन ईसी एमएल प्रमाणात अर्धा केजी. पाण्यात फवारणी केली जाते.

पांढरी माशी : हा किटक पांढरा पंख आणि पिवळ्या रंगाचा आहे, ही माशी एका मिलीमीटरपेक्षा लहान आहे. ही माशी झाडाच्या पतीवर बसून रस शोषून घेते, लाळ तेथेच ठेवते, रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. यावर प्रतिबंध करताना कीटकांना आकर्षित करण्यासाठी पिवळ्या रंगाचे सापळे आणि चिकट टॅग वापरा. शिकारी पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी टी आकाराच्या बांबूचे खांब प्रति एकर १ नग वापरा. प्रति किलो बियाणे इमिडाक्लोप्रिड ७० डब्ल्यूएस १० ग्रॅम वापरल्याने चांगला फायदा होईल.

माइट बारुथी : हा किडा उघड्या डोळ्यांनी पाहणे शक्य नाही, एका ठिकाणी तो कळपात मोठ्या संख्येने असतो आणि उन्हाळयात काकडीसारख्या पिकांमध्ये जास्त प्रादुर्भाव होतो, याचा प्रादुर्भाव झाल्यामुळे झाडे त्यांचे बनवण्यास असमर्थ आहेत. अन्न आणि बडवार थांबते. यावर प्रतिबंध करण्यासाठी, पॉवर फवारणी यंत्राद्वारे पाण्याचे फवारणी केल्यास कोळी पिकापासून विभक्त होते, ज्यामुळे उद्रेक कमी होतो. स्पिरोमासिफेन ९ एससी ०.८ मिली प्रति लीटर किंवा डायकोफल १८.५ ई सी ५ मिली प्रति लिटर किंवा फेनप्रोथ्रीन ३० ईसी ०.७५ ग्रॅम प्रति लिटर १० ते १५ दिवसांच्या अंतराने शिंपडा जेणेकरून याचा प्रादुर्भाव कमी होऊ शकेन.

# शेळी, मेंढीमधील परजीविजन्य आजार

कोक्सिडिओसिस हा शेळ्या-मेंढ्यांमधील प्रमुख परजीविजन्य आजार आहे. हा आजार आयमेरिया परजीवीमुळे होतो. हा परजीवी मेंढी, शेळीच्या आतड्यांमध्ये वाढतो, त्यामुळे पचन क्रियेमध्ये अडथळा येतो. या परजिवीची अंडी त्यांच्या विष्ठेतून बाहेर पडतात. यामुळे खाद्य, पाणी दूषित होते. दूषित पाणी, खाद्याद्वारे आजाराचा प्रसार वाढतो. विशेषत: ४ ते ६ आठवड्यांच्या लहान करडांमध्ये हा आजार अधिक दिसतो. योग्य उपचार न केल्यास गंभीर परिणाम होऊन जनावर दगावते.

आजार होण्याची कारणे :अस्वच्छ गोठा, विष्ठा, दूषित पाणी, चारा खाण्यामुळे संक्रमणाचा धोका वाढतो.

गोठ्यात जनावरांची जास्त गर्दी झाल्यास परजीवींच्या प्रसाराला मदत होते. पोषक आहाराची कमतरता असल्यास प्रतिकारशक्ती कमी होऊन जनावर आजार पडते. दूध देणे, गर्भधारणा, अचानक वातावरणीय बदल हे ताणतणावाचे घटक प्रतिकारशक्तीवर परिणाम करतात.

या मार्गाने होता प्रसार : आजाराचा प्रसार संक्रमित जनावरांच्या विष्ठेमधून बाहेर पडलेल्या ईआयमेरिया अंड्यांमधून होतो. अंडी दूषित चारा,



पाणी, जमीन याद्वारे जनावरांमध्ये पोहोचतात.

जनावरांच्या आहारातून ही अंडी आतड्यांमध्ये जाऊन वाढतात आणि संक्रमण सुरू होते. दूषित पाणी आणि चाऱ्याचे सेवन हा प्रसाराचा मुख्य मार्ग आहे.लक्षणे : आजाराच्या लक्षणांची तीव्रता संक्रमित परजीवीच्या प्रजाती आणि जनावरांच्या प्रतिकारशक्तीवर अवलंबून असते. सौम्य संक्रमण झाल्यास विशिष्ट लक्षणे दिसत नाहीत, परंतु तीव्र संक्रमणात अतिसार, वाढीमध्ये अडथळा, अशक्तपणा आणि दुर्बलता, रक्तक्षय, निर्जलीकरण अशी लक्षणे दिसून येतात. गंभीर प्रकरणांमध्ये, लहान कोकरू किंवा करडे मृत्यूपर्यंत पोहोचू शकतात. कोकरे, करडे : विशेषत: ४ आठवडे ते ६ महिने वयाच्या करडांमध्ये हा आजार अधिक दिसतो. या वयोगटातील पिले क्लिनिकल कोक्सिडिओसिस आजारास सर्वात जास्त संवेदनाक्षम असतात.

उपचार : या आजाराच्या उपचारासाठी औषधे उपलब्ध आहेत. लक्षणे दिसताच पशुवैद्यकाशी संपर्क साधून निश्चित निदान केल्यानंतर योग्य उपचार करावेत. लवकर उपचार केल्यास जनावरांची स्थिती सुधारते. योग्य औषधोपचारासोबत जनावरांना स्वच्छ आणि पोषक आहार दिल्यास त्यांची प्रतिकारशक्ती वाढते. निर्जलीकरण टाळण्यासाठी पुरेसे पाणी दिले पाहिजे.

आजार होऊ नये यासाठी काळजी : निवाऱ्याची नियमित स्वच्छता करावी. विष्ठा आणि दूषित पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी निवाऱ्यात योग्य व्यवस्थापन पद्धती वापरावी. जनावरांना स्वच्छ पाणी आणि चारा उपलब्ध करावा.दूषित पाणी, अन्नामुळे आजाराचा प्रसार होऊ शकतो. जनावरांची अतिगर्दी होऊ देऊ नये. गर्दीमुळे परजीवींच्या प्रसाराला चालना मिळते. ठरावीक काळानंतर औषधे वापरून संक्रमणाची शक्यता कमी करता येते. लहान जनावरांमध्ये आजाराचा धोका अधिक असतो, त्यामुळे विशेष काळजी घ्यावी.




## जागतिक दिवस

जागतिक ऑलिम्पिक दिवस

आंतरराष्ट्रीय विधवा दिन

### महत्वाच्या घटना

१७५७ : प्लासीची लढाई : 'पलाशी' येथे रॉबर्ट क्लाईवच्या ३,००० सैन्याने सिराज उद्दौलाच्या ५०,००० सैन्याचा फितुरी करवून पराभव केला.
१८६८ : क्रिस्टोफर लॅथम शॉल्स यांना टाईप-राइटर च्या शोधासाठी पेटंट मिळाले.
१८९४ : पॅरिस येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितिची स्थापना झाली.
१९१२ : ऍलन ट्युरिंग, इंग्लिश गणितज्ञ व संगणकशास्त्रज्ञ.
१९२७ : भारतीय नभोवाणी मुंबई येथे सुरु.
१९६० : अमेरिका आणि जापान देशांमध्ये सुरक्षा संबंधी समझोता करण्यात आला.
१९६९ : आय.बी.एम. ने जाहीर केले की जानेवारी १९९७ पासून सॉफ्टवेअर आणि इतर सेवांची किंमत वेगवेगळी होईल त्यामुळे आधुनिक सॉफ्टवेअर उद्योग सुरु झाला.
१९७९ : इंग्लंडला ९२ धावांनी हरवून वेस्ट इंडिजने दुसरा क्रिकेट विश्वकरंडक जिंकला.
१९८५ : दहशतवादी बॉम्बचा एअर इंडियाच्या कनिष्क बोइंग ७४७ विमानात स्फोट. ३२९ ठार.
१९९६ : आवामी लीगच्या शेख हसीना वाजेद यांचा बांगलादेशच्या पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला. या बांगलादेशच्या दुसर्या महिला पंतप्रधान होत.
१९९८ : दुसर्या महायुद्धात जपानच्या शरणागतीची साक्षीदार असलेली 'यू. एस. एस. मिसुरी' ही युद्धनौका निवृत्तीनंतर पर्ल हार्बर बंदरात दाखल झाली.
२०१६ : युनायटेड किंग्डम ने ५२% ते ४८% मतदान होऊन युरोपियन युनियनला सोडले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७७ : भारतीय-इंग्लिश अभिनेते नॉर्मन प्रिचर्ड यांचा जन्म. (मृत्यू: ३१ ऑक्टोबर १९२९)
१९०१ : राजेन्द्र नाथ लाहिरी क्रांतिकारक (मृत्यू: १७ डिसेंबर १९२७)
१९०६ : वीर विक्रम शाह 'त्रिभुवन' नेपाळचे राजे (मृत्यू: १३ मार्च १९५५)
१९१६ : सर लिओनार्ड तथा 'लेन' हटन इंग्लिश क्रिकेटपटू (मृत्यू: ६ सप्टेंबर १९९०)
१९२९ : पाच वेळेच्या ग्रॅमी पुरस्कार विजेता अमेरिकन गायिका, गीतकार, अभिनेत्री, नर्तक, विनोदकार आणि लेखिका जून कार्टर यांचा जन्मदिन.
१९३४ : राष्ट्रीय एकात्मतासाठी इंदिरा गांधी पुरस्कार, गांधी पीस पुरस्कार, पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय गांधीवादी पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्ते तसचं, दशोली ग्राम स्वराज्य संघाचे संस्थापक चंडीप्रसाद भट्ट यांचा जन्मदिन.
१९३४ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी, व हिमाचल प्रदेशाचे माजी (४थे) मुख्यमंत्री वीरभद्र सिंह यांचा जन्मदिन.
१९३५ : मराठी लेखक राम कोलारकर यांचा जन्म.
१९३६ : ग्रीक पंतप्रधान कॉस्टास सिमिटिस यांचा जन्म.
१९४२ : दिग्दर्शक जब्बार पटेल यांचा जन्म. जब्बार रझाक पटेल हे मराठी चित्रपटसृष्टीतील आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक नाट्य आणि चित्रपट दिग्दर्शक आहेत. अनेक पैलू असणाऱ्या आंबेडकरांचे जीवन तीन तासाच्या चित्रपटात रेखाटणे ही अवघड बाब असताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील चित्रपट केला. या चित्रपटाने त्यांना अनेक पुरस्कार मिळवून दिले.
१९४८ : नबरुण भट्टाचार्य भारतीय पत्रकार आणि लेखक (निधन: ३१ जुलै २०१४)
१९५२ : राज बब्बर, भारतीय चित्रपट अभिनेते, राजकीय नेते
१९७२ : झिनेदिन झिदान फ्रेन्च फूटबॉलपटू
१९८० : वेस्ट इंडीजचा क्रिकेट खेळाडू रामनरेश सरवण यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

७९ : ७९ई.पुर्व: रोमन सम्राट व्हेस्पासियन यांचे निधन. (जन्म: १७ नोव्हेंबर ०००९)
१७६१ : बाळाजी बाजीराव तथा नानासाहेब पेशवे यांचे निधन. (जन्म: ८ डिसेंबर १७२१)
१८३६ : स्कॉटिश तत्त्ववेत्ते, इतिहासकार व अर्थशास्त्रज्ञ जेम्स मिल यांचे निधन. (जन्म: ६ एप्रिल १७७३)
१८९१ : विल्हेल्म एडवर्ड वेबर (छायाचित्र पहा), जर्मन भौतिकशास्त्रज्ञ.
१९१४ : भारतीय गुरु आणि तत्वज्ञ भक्तिविनाडो ठाकूर यांचे निधन. (जन्म: २ सप्टेंबर १८३८)
१९३९ : आधुनिक बालशिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते गिजुभाई बधेका यांचे निधन. (जन्म: १५ नोव्हेंबर १८८५ चितल, अमरेली, गुजराथ)
१९५३ : डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, भारतीय जनसंघाचे संस्थापक, अध्यक्ष, शिक्षणतज्ज्ञ.
१९७५ : जनरल प्राणनाथ थापर, भारताचे भूसेनाप्रमुख. (जन्म: २३ मे १९०६)
१९८० : भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न व्ही. व्ही. गिरी यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १८९४)
१९८० : संजय गांधी, भारतीय राजकारणी (जन्म: १४ डिसेंबर १९४६)
१९८२ : बालगंधर्व आणि मास्टर कृष्णराव यांना ऑर्गनची साथ करणारे गंधर्व नाटकमंडळीतील नामवंत कलाकार हरिभाऊ देशपांडे यांचे निधन.
१९९० : चरित्र अभिनेते हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय यांचे निधन. (जन्म: २ एप्रिल १८९८ हैदराबाद, आंध्र प्रदेश)
१९९४ : नाटककार, साहित्यिक वसंतशांताराम देसाई यांचे निधन.
१९९५ : पोलिओची लस शोधणारे शास्त्रज्ञ डॉ. जोनस सॉक यांचे निधन.
१९९६ : ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू रे लिंडवॉल यांचे निधन. (जन्म: ३ ऑक्टोबर १९२१)
२००५ : साहित्यिक डॉ. हे. वि. इनामदार यांचे निधन.
२०१५ : भारतीय नन, वकील, आणि समाजसेवक निर्मला जोशी यांचे निधन. (जन्म: २३ जुलै १९३४)
२०२० : निलंबर देव शर्मा डोंगरी भाषेतील साहित्याबद्दल इंग्रजीतील पहिले प्रकाशन केलेले लेखक पद्मश्री (जन्म: ६ ऑक्टोबर १९३१)

# राष्ट्रीय महामार्गाच्या मंजुरीचे श्रेय घेणाऱ्या पुढाऱ्यांनी अपघातात बळी गेलेल्यांची जबाबदारी घ्यावी

## निकृष्ट दर्जाच्या रखडलेल्या कामामुळे गतवर्षी ४५९ तर यावर्षी ५ महिन्यांत १५७ बळी

बीड। प्रतिनिधी

भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांच्या आदेशानुसार २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात बीड जिल्ह्यातील लातुर ते लोखंडी सावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव १८ किलोमीटर रस्त्यावरील उर्वरित लांबीचे चौपदीकरण आणि माजलगाव ते केज दरम्यान धारूर जवळच्या ब्लॅक स्पॉट ठरलेल्या घाट या दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटी रूपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत.

आम्हीच कामे केंद्रीय मंत्री नितिनजी गडकरी यांच्या कडुन मंजूर करून आणली म्हणत नितिनजी गडकरी यांचे आभार मानत माजी खासदार प्रितमताई मुंडे व विद्यमान खासदार बजरंग बप्पा सोनावणे यांची श्रेयवादासाठी दैनिकात पत्रकबाजी सुरू आहे. मात्र याचवेळी गेल्या वर्षी २०२४ मध्ये अपघातात ४५९ जणांनी आपला जीव गमावला तर ३९७ जण गंभीर जखमी झाले होते. तर जानेवारी २०२५ ते मे २०२५ या गेल्या ५ महिन्यात २५९ अपघातात १५७ जण मृत्युमुखी पडले असून व १०२ जण गंभीर जखमी झाल्याची शासन दरबारी नोंद आहे. निकृष्ट रस्ते, गुळगुळीत रस्त्यावरील गतिरोधकांचा अभाव, दिशादर्शक फलक नसणे आणि रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृतीच्या नावाखाली फोटो सेशन यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे.जिल्ह्यातील महामार्गावर ४० ब्लॅंक स्पॉट आहेत.याबाबतीत मात्र केवळ सामाजिक कार्यकर्ते यांनीच वारंवार प्रशासन व सरकारला निवेदन,आंदोलनाद्वारे जागे करण्याचा प्रयत्न केला असुन आज श्रेयवादासाठी धडपडणारे लोकप्रतिनिधी मुग गिळून गप्प होते त्यामुळे या अपघातांची जबाबदारी सुद्धा त्यांनी घ्यायला हवी अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.




एखाद्या ठिकाणी वारंवार होणारे अपघात लक्षात ठेवुन तेथील रस्त्याची स्थिती आणि अपघाताचे कारण शोधून उपाययोजना केल्या जातात.या जीवघेण्या अपघात प्रवण स्थळांना '' ब्लॅंक पोट '' म्हणून निश्चित केले जाते. बीड जिल्ह्यात महामार्गावर ४० ब्लॅंक स्पॉट''

ठरविण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे सिरसाळा ,नित्रुड, नंदगाव डेअरी सायगाव ता.आंबेजोगाई )धारूर घाट, होळेश्वर विद्यालय, एचपी पेट्रोलपंप ते चंदनसावरगाव, सुडी पार्टी ते मांगवडगाव, लोखंडी सावरगाव, धामणगाव, वाघळूज, साबलखेड, पांढरी, पोखरी, चुंबळी फाटा, बामदळवाडी ,मांजरसुंबा घाट, मंझेरी रोड ,पाली , छत्रपती संभाजी महाराज चौक, पाडाशिंगी ब्रिज ,रांजणी ,गढी पूल ,वडगाव ढोक, नायरा पंप गेवराई, बागपिंपळगाव ,नागझरी सिरसदेवी शिवार, मादळमोही पेट्रोलपंप, सावरगाव, पांगर बावडी याठिकाणांचा समावेश आहे.

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावर गेल्यावर्षी जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ दरम्यान ४५९ जणांना अपघातात जीव गमवावा लागला असुन ३९७ जण गंभीर जखमी झाले आहेत तर यावर्षी जानेवारी २०२५ ते मे २०२५ दरम्यान २५९ अपघातात १५७ जण मृत्युमुखी पडले असुन १०२ जण गंभीर जखमी झाल्याची शासन दरबारी नोंद आहे.

रस्त्यांची कामे ठरलेल्या कालावधीत पूर्ण न करता रखडलेले रस्ते, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे उद्घाटनापुर्वीच रस्त्याला तडे जाणे, मोठमोठ्या भेगा पडणे ज्यात वाहनांचे चाक अडकुन अपघात होणे, अपघात प्रवण स्थळी गतिरोधकांचा अभाव, महामार्गावर अनेक ठिकाणी वळणावर सुचना व दिशादर्शक फलकांचा अभाव व सिग्नल यंत्रणा नसणे आदी असुविधांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले.सामाजिक कार्यकर्ते यांनी यावेळी आवाज उठवला असताना लोकप्रतिनिधींनी मात्र याकडे दुर्लक्ष करत मुग गिळून गप्प बसल्याचे दिसून आले.यासंदर्भात आवाज उठवण्याचे टाळले.आत्ता मात्र स्थानिक स्वराज्य संस्था आणि नगरपरीषद निवडणुकांच्या तोंडावर श्रेयवादाची पत्रकबाजी सुरू असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

# नियमांचे पालन करुन निर्भयपणे व्यवसाय करा- हस्तीमल बंब

जालना। प्रतिनिधी

व्यापार्यांना दैनंदिन लागणारे उपयोगी कीट चे दि २० जून रोजी वितरण करण्यात आले, त्यावेळी बोलतांना जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब म्हणाले उद्योग व्यवसायात शासनाचे अनेक कायदे - नियम आहे, वेग-वेगळे कर सुध्दा लावण्यात आलेले आहे. जी. एस. टी. आयकर, अन्न व भेसळ कायदा कामगार, वजन मापे, त्याच बरोबर लहान-सहान विशेष करुन महिलांसाठी, ग्रामीण भागसाठी पंतप्रधान आत्मनिर्भर इ. शासनाची अनेक योजना आहे.



नाममात्र व्याजाने कर्ज देण्यात येते व त्यात अनुदान सुध्दा आहे. या सर्व योजनासाठी जिला ग्रामीण उद्योग कार्यालयात प्रस्ताव दाखल करावा हे सर्व माहितीचे पत्रक, मागणीचे अर्ज नमुन्यांची सामुग्री कीट मध्ये देण्यात आली आहे. त्याच बरोबर जिल्ह्यातील व्यापार्यांसाठी डिजिटल आरबीट ॲप तैयार करण्यात आले आहे. या अभियानाची संपुर्ण माहिती कीट मध्ये देण्यात आली आहे. नुकतेच प्रकाशन झालेली डायरी सुध्दा टाकण्यात आली आहे. कर भरण्यास आपला जिला आघाडीवर आहे. जिल्ह्यात गावो-गावी कायदे विषयक शिबीर घेण्यात आलेले आहे. नियमांचे पालन करून निर्भय पणे व्यवसाय करावा असे बंब म्हणाले. डिजिटल अभियानाचे प्रमुख मकरंद शहापुरकर म्हणाले आधुनिक तंत्रज्ञान व टेकनोलॉजीचे आपले पारम्पारिक व्यवसायात उपयोग करणे गरजेचे आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व व्यापार्यांना डिजिटल अभियानात समाविष्ट करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने देश-विदेशातील उद्योग व्यापार क्षेत्रातील सर्व माहिती घर बसल्या आपल्या काम्प्युटर, मोबाईल मध्ये मिळु शकतात. त्यात आपल्या व्यवसाय वाढीसाठी मदत होईल. म्हणून प्रत्येकांनी डिजिटल अभियानात नोंदणी करावे, असे शहापुरकर म्हणाले. शहारातील जिंदल मार्केट मधील राहुल ट्रेडर्स यांच्या कार्यालयात व्यापार्यांची बैठक घेण्यात आली होती. माजी अध्यक्ष शिवाजी तनपुरे, प्रभाग प्रमुख शशिकांत रोडे यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमासाठी शाम कटकम, कृष्णा जाधव, भाऊसाहेब सोनुने, शांतीलाल सोमाणी, शरद बाहेती, नितीन तलरेजा, दिलीप वासवाणी, नितीन वासवाणी इ. परिश्रम घेतले. उपस्थित सर्व जनरल मर्चन्टचे व्यापार्यांना उपयोगी कीटचे वितरण करण्यात आले. किटसाठी सागर बॅग हाऊस यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन सुभाष सोनुने यांनी केले तर आभार अनुप जैन यांनी मांडले.

# ऐन पेरणीच्या तोंडावर शेतकरी हवालदिल,दुबार पेरणीच्या उंबरठ्यावर उभा

## तरीही रुपामाता गुऱ्हाळाकडील उसाचे पैसे सहा महिन्यापासुन थकीत

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील शेतकरी पेरणीच्या तोंडावर आर्थिक संकटात सापडलेला असून हवालदिल झाला आहे तर दुबार पेरणीचे संकट समोर उभे असतानाही रूपा माता गुऱ्हाळा कडून सहा महिन्यापासून शेतकऱ्याच्या उसाचे पैसे थकीत असल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून माजलगाव तालुक्यातील प्रत्येक वर्षी हीच रित असून सहा सहा महिने वर्ष वर्षे शेतकऱ्यांना उसाच्या पैशासाठी उंबरठे शिजवायला लावणाऱ्या रूपामाता कारखान्याच्या संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करून गुराळाच्या जमिनीसह गुऱ्हाळाचा लिलाव करून शेतकऱ्याचे पैसे अदा करावेत अशी मागणी शेकापच्या वतीने उपजिल्हाधिकारी माजलगाव यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



निवेदनात म्हटले आहे की,रोषनपुरी येथील रुपामाता गुर्हाळाकडुन प्रत्येक वर्षी सुरुवातीच्या पंधरा दिवसाचे बिले दिली जातात त्यानंतर शेतकऱ्यांना बिलासाठी सहा सहा महिने गुर्हाळाचे उंबरठे झिजवावे लागतात. ऐन पेरणीच्या तोंडावर व दुबार पेरणीचे संकट घोंगावत असतांनाही रूपामाता गुराळ शेतकऱ्यांचे ऊस बीलाची रक्कम देण्यास तयार नाही. शेतकऱ्यांचे थकीत बिलाची रक्कम तात्काळ द्यावी यासाठी शेकापच्या वतीने उपजिल्हाधिकारी कार्यालयावर दि.२४ जुन मंगळवार रोजी हलगी बजावो आंदोलन करण्यात येणार असुन प्रशासनातील अधिकारी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करतात पण कठोर कारवाईचे पाऊल उचलत नाहीत ही बाब शेतकरी कामगार पक्ष कदापिही खपवून घेणार नाही तर गुर्हाळाच्या संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करुन गुर्हाळाची जप्ती करण्यात यावी व त्याचा कायदेशीर लिलावातुन ऊसाची थकीत रक्कम द्यावी या मागणीसाठी दि २४ जुन मंगळवार रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने हलगी बजावो आंदोलन करण्यात येणार आहे तरी ऊसाचे पैसे थकीत असणार्या शेतकरी बांधवांनी शेकडो च्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शेतकरी नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी केले आहे.

# कार्यकर्त्यांचा काँग्रेसला राम राम करून शिवसेनेत प्रवेश



जालना । प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाच्या दिनकर घेवंदे यांनी राम राम करून पक्षाला सोडचिठ्ठी देत महाराष्ट्र विधिमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश केला. भाग्यनगर परिसरातील आ. खोतकर यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या प्रवेश सोहळ्यास सुनील किनगांवकर, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, गणेश राऊत, निखिल पगारे, महेश दुसाने, उपजिल्हाप्रमुख गणेश सुपारकर ,दिनेश भगत, राधाकिसन दाभाडे, ॲड. राहुल हिवराळे ,बाळकृष्ण कोत्ताकोंडा, योगेश रत्नपारखे, युवा सेना जिल्हा समन्वयक शुभम टेकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. अर्जुनराव खोतकर यांनी सामाजिक चळवळीतून आलेले नेतृत्व दिनकर घेवंदे यांना पक्षात सन्मानाची वागणूक आणि न्याय दिला जाईल. अशी हमी त्यांनी दिली. दिनकर घेवंदे यावेळी म्हणाले, अनेक वर्षांपासून आपण काँग्रेस पक्षात सक्रियपणे काम केले.

काँग्रेस पक्षाने केवळ स्वतःच्या फायद्यासाठी चळवळीतील कार्यकर्त्यांचा वापर केला असे सांगून फुले- शाहू - आंबेडकरांची विचारधारा जोपासणारे आ. अर्जुनराव खोतकर यांनी शहराचा विकास करून दाखवला आहे . आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष बळकट करण्यास योगदान देणार असल्याचे दिनकर घेवंदे यांनी सांगितले. यावेळी पदाधिकारी, शिवसैनिक आणि भीमसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शिवाजी पाटोळे यांचा सेवापूर्ती समारंभ

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रयोगशाळा सहाय्यक शिवाजी पाटोळे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सेवापुर्ती समारंभ सोहळा रविवारी संपन्न झाला.



रविवार दि.२२ रोजी बीड येथे शिवाजी धोंडीराम पाटोळे यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए.एस. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब काकडे, शिक्षक नेते उत्तमराव पवार, गिरीश देशपांडे, अशोक जाधव, उमाकांत भद्रशेट्टी सुभाष क्षीरसागर, मुख्याध्यापक महादेव जाधव राजेंद्र कुर्हे, अभिषेक राऊत, सुरेश पेशकार , भाऊसाहेब देशमाने, प्रकाश राठोड यांची उपस्थिती होती. शिवाजी पाटोळे हे २९वर्ष १० महिन्याच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले त्यांनी सन १९९५ ते २००३ या कालावधीत सेवक, प्रयोगशाळा परिचर या पदावर सेवा केली सन २००६ मध्ये पाडळी हायस्कूल पाडळी येथे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर पदोन्नती मिळाली सन२०१८ पासून कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी येथे ३१ मे २०२५ पर्यंत सेवा करून सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कैलास पाटोळे, उत्तमराव पवार, गिरीष देशपांडे, अण्णासाहेब थिटे, नानासाहेब काकडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून पाटोळे यांना उदंड आणि निरोगी आयुष्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अजिंक्य चांदणे, सुभाष लोणके, विजय सरवदे, सहदेव खांडे, शिवाजी देवमाने, अविनाश वाघ, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय दुधाळ, पत्रकार प्रशांत सुलाखे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचे बीड तालुकाध्यक्ष दत्तात्रय डाके यांच्यासह मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महिला- पुरुषांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. श्रीराम जाधव यांनी केले तर शेवटी पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# माजलगाव येथील फ्लाइंग बर्ड्स अकॅडमीमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



माजलगाव। प्रतिनिधी

येथील नामांकित इंग्रजी माध्यमाची शाळा, फ्लाइंग बर्ड्स अकॅडमी येथे दि २१ जुन शनिवार रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात शाळेतील जवळपास ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत प्रशिक्षित योग गुरूकडून योगासनांचे धडे घेतले.

जागतिक योग दिना निमित्त फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी मध्ये प्रशिक्षित योग गुरु बालासाहेब गरड यांनी विद्यार्थ्यांना योग प्रात्यक्षिकांचे आणि योगासनांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विविध योगासने आणि प्राणायाम यांचे प्रशिक्षण दिले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्व आणि त्याचे शारीरिक व मानसिक फायदे समजून घेण्यास मदत झाली. यावेळी ठोंबरे सराफ यांचेकडून सूर्य नमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले त्यात पाच विध्यार्थ्यांना उत्कृष्ठ सूर्य नमस्कार केल्याबद्दल पारितोषिक देण्यात आले. यावेळी शाळेतील १ ली ते ९ वी वर्गातील ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी फ्लाइंग बर्ड्स अकॅडमीचे अध्यक्ष पांडुरंग चांदक,जगदीश चांदक,प्राचार्या सारिका बजाज, उपप्राचार्य गायकवाड, उपप्राचार्या स्वाती बनसोडे यांच्यासह सह शिक्षक ओंकार पवार,प्रदुम्न रासवे सह सर्व सहशिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांसोबत योगासने केली आणि योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. योग आणि निरोगी जीवनाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ममता शिंगाडे मॅडम यांनी केले तर आभार अंकिता मॅडम यांनी मानले.

# निरोगी आरोग्यासाठी नियमित योगा आवश्यक - रत्नपारखी

माजलगाव। प्रतिनिधी

जागतिक योग दिनाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात दि २१ जून शनिवार रोजी जागतिक योग दिवस म्हणून भारतभर सर्वत्र साजरा होत आहे त्याचाच एक भाग म्हणून माजलगाव येथे नामदार पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेवरून व जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सक्सेस पब्लिक स्कूलमध्ये भारतीय जनता पार्टी माजलगाव शहर मंडळ व पात्रुड मंडळाच्यावतीने जागतिक योग दिनानिमित्त योग शिबीरात विविध योगासने व प्राणायाम घेऊन योग शिबीर संपन्न झाले.



भारत मातेचे प्रतिमा पूजन करून योग प्रशिक्षक नंदकुमार शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्रस्ताविक पर मनोगत व्यक्त करताना माजलगाव भाजपा शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी म्हणाले आजच्या धकाधकीच्या व स्पर्धेच्या युगामध्ये आपण स्वतःच्या शरीरासाठी वेळ देत नसल्यामुळे आपल्याला अनेक आजाराला सामोरे जावे लागते,आज आपण सर्वजण मानसिक व शारीरिकदृष्ट्या कणखर व मजबूत असलेच पाहिजे, यासाठी ''योगा व प्राणायाम'' हाच प्रभावी उपाय आहे. योग दिनाच्यानिमित्त आपण सर्वांनी योगाभ्यासाचे महत्त्व ओळखून आज पासून दररोज दिवसातून काही वेळ योगाकरीता देण्याचा निश्चय संकल्प प्रत्येकाने योग दिनाच्या निमित्त करू.योग प्रशिक्षक नंदकुमार शिंदे,महेश आगे यांनी रोज नियमित योगा केल्याने काय फायदा होतो त्याचबरोबर सूर्यनमस्कार व विविध प्राणायामाची माहिती देत योगासने करून दाखवले.याप्रसंगी पवन मोगरेकर यांनी देखील योग दिनाचे महत्त्व विस्तृतपणे सांगितले. या योगदिनाच्या निमित्त भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ प्रशांत पाटील,माजी नगराध्यक्ष डॉ.अशोक तिडके, पात्रुड मंडळाध्यक्ष डॉ.अभिजीत सोळंके,ज्ञानेश्वर माऊली सरवदे, ईश्वर खुरपे, अविनाश कानडे, बाळासाहेब साळवे, दत्ता महाजन,डॉ सचिन देशमुख, प्रल्हाद दळवी, बाळासाहेब क्षिरसागर,आनंद कुलकर्णी,सिद्धेश्वर राठोड,मनोज कोरडे,विकास पाटील,अनिल गोंडे,पंढरीनाथ जोशी,कमलाकर देशमुख सह भाजपाचे व शहरातील विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना पात्रुड मंडळाचे अध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके म्हणाले या शिबिरासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल व चांगली व्यवस्था उपलब्ध करून दिल्याबद्दल निखिल वाघमारे यांचे आभार व्यक्त करत या कार्यक्रमासाठी भाजपाचे सर्व पदाधिकारी सदस्य व शहरातील नागरिक उपस्थित राहिले त्याबद्दल आभार मानले.

# फार्मर आयडी नसल्यास शेतकऱ्यांना लाभ मिळणार नाही – पवळ

जालना। प्रतिनिधी

फार्मर आयडी नसल्यास शेतकऱ्यांना कृषी योजनेचा लाभ मिळणार नाही तसेच मिळणाऱ्या लाभ बंद होणार आहे अशी माहिती तालुका कृषी अधिकारी श्री पवळ यांनी दिली आहे.

तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढून घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी एस.एन. पवळ यांनी केले आहे. यापुढे फार्मर आयडी नसल्यास शेतकऱ्यांना शासनाच्या कृषी विषयक विविध योजनांचा लाभ मिळणे बंद होणार आहे. याबाबत माहिती देताना तालुका कृषी अधिकारी पवळ यांनी सांगितले, की आपल्या नावावर ७/१२ उतारा असलेल्या सर्व व्यक्तींनी आपल्या गावातील किंवा जवळील सीएससी केंद्रांशी संपर्क साधून तात्काळ फार्मर आयडी तयार करून घ्यावी. यासाठी सातबारा, नुमना आठ अ व मोबाईल क्रमांक आधार क्रमांकाशी जोडलेला असणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाची ओळख जशी आधारकार्ड द्वारे होते, त्याचप्रमाणे शेतकरी असल्याची अधिकृत ओळख फार्मर आयडीद्वारे होणार आहे. यामुळे शासनाच्या कृषी विषयक सर्व योजना, सवलती आणि लाभ मिळवण्यासाठी फार्मर आयडी अत्यावश्यक ठरणार आहे. फार्मर आयडी नसल्यास पीएम किसान सन्मान निधी, नमो शेतकरी महासन्मान निधी, पिक विमा, पीककर्ज, नैसर्गिक आपत्ती नुकसान, जमीन खरेदी-विक्री प्रक्रिया, कर्जमाफी याचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार नाही.आपले नुकसान होण्याआधीच तात्काळ फार्मर आयडी तयार करून घ्या, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी एस. एन. पवळ यांनी केले आहे.

## टीसी हरवला आहे

**सोमनाथ भगवान भालेकर या विद्यार्थ्यांचा इयत्ता दहावी पासचा टी.सी. बीड-काजाळा एस.टी. प्रवासात दरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क करा.**

**संपर्क**

**सोमनाथ भगवान भालेकर**

**मो.७०३०७५७६४२**

राज्य लोकतंत्र
सोमवार, दि.२३ जुन २०२५ | ६

# लोखंडी सावरगाव ते बर्दापूर महामार्गाचे होणार चौपदरीकरण !

## वार्षिक आराखड्यात समावेश; केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी केली वचनपूर्ती

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

**शहराजवळून जाणारा ५४८ बी हा महामार्गावरील बर्दापूर ते लोखंडी सावरगाव या टप्प्याचे चौपदरीकरण करण्याचे आ. नमिता मुंदडा यांच्या प्रचारसभेत दिलेले वचन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पूर्ण केले आहे. केंद्र सरकारच्या वार्षिक आराखड्यात या मार्गाच्या चौपदरीकरणाचा समावेश करण्यात आला आहे.**

अंबाजोगाई आणि लातूरला जोडणाऱ्या ५४८ बी या महामार्गावर बर्दापूरच्या पुढे येताच चार पदरी रस्त्याचे अचानक दोन पदरीत रूपांतर होते. या ठिकाणी येणाऱ्या वाहनांच्या गतीचा अचानक अडथळा होत असल्यामुळे याठिकाणी वारंवार गंभीर अपघात घडत आले आहेत. अनेक निष्पाप नागरिकांचे जीव या अपुऱ्या आणि असुरक्षित रस्त्यामुळे गेले आहेत. त्यामुळे या मार्गाचे



### लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा रस्ता चौपदरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्याचेही आदेश

चौपदरीकरण करण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने केली जात होती.माजी खासदार प्रीतमताई मुंडे आणि अंबाजोगाईच्या आमदार नमिता मुंदडा यांनी ही नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन

### मांजरसुंबापर्यंत रस्ता चौपदरीकरणासाठी प्रयत्न सुरू : आ. नमिता मुंदडा

सध्या दोन पदरी असलेल्या लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या मार्गाचेही चौपदरीकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे आदेश मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्याचे आ. मुंदडा यांनी सांगितले.

गडकरी यांच्याकडे वारंवार मागणी केली. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान अंबाजोगाई येथे झालेल्या आ. नमिता मुंदडा प्रचारसभेत गडकरी यांनी या प्रकल्पासाठी सहा महिन्यांत निर्णय घेण्याचे जाहीर आश्वासन दिले होते.

त्यानंतरही आमदार नमिता मुंदडा यांनी विधीमंडळ अधिवेशनाच्या काळात गडकरी यांची पान ३ वर

# चार महिन्यांपूर्वी चोरीस गेलेली मोटारसायकल आरोपीसह पकडुन फिर्यादीस केली सुपूर्द

**माजलगाव | प्रतिनिधी**

**फिर्यादी नामे हनुमान रामकिसन शिंदे राहणार ब्रह्मगाव यांची त्यांच्या राहत्या घरासमोरून दि ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री रॉयल इन्फिल्ड कंपनीची बुलेट मोटार सायकल क्र.एम.एच.४५ ए.जी.८०७७ किंमत १,३०,००/- रुपयाची कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती.**

त्यावरून पोस्टे माजलगाव शहर येथे गुरन ५२/२०२५ कलम ३०३ (२) बी एन एस प्रमाणे गुन्हा नोंद करून सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोह/१७९६ राम खेत्रे यांच्याकडे दिला. सदर गुन्ह्यात तांत्रिक विश्लेषनाद्वारे आरोपीचा शोध घेऊन आरोपी नामे सुरज बाळासाहेब गायकवाड राहणार मोगरा तालुका माजलगाव याने सदर गाडी चोरी केले असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेली बुलेट



मोटरसायकल क्र.एम.एच-४५ ए.जी-८०७७, किंमत १,३०,०००/-रुपयाची मोटार सायकल हस्तगत करून यातील फिर्यादी यांचे ताब्यात सुपूर्त केली आहे.यातील फिर्यादी यांनी पोलीस ठाणे येथे येऊन पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कौतुक केले व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून आभार व्यक्त केले आहेत. सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, यांचे मार्गदर्शनाखाली राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक माजलगाव शहर, हे.कॉ/१७९६ राम खेत्रे, हे.कॉ/१२ गणेश तळेकर, पो.कॉ/२२९९ संतराम थापडे यांनी केली आहे.

# राशनच्या कट्ट्यात का कमी येतो माल?

## कोण मारतो डल्ला, आणि कोणाचे होतात हाल

माजलगाव | प्रतिनिधी

तालुक्यातील देपेगाव येथे गावकऱ्याकडून राशन कमी मिळत असल्याबाबत तक्रार आल्यामुळे संबंधित देपेगाव येथील राशन दुकानावर जाऊन प्रत्यक्ष त्याबाबत चौकशी केली त्यावेळी दुकानदार गिरी यांनी राशन चा माल तहसील कार्यालयाकडुनच प्रत्येक कट्ट्यात कमी येत असल्याची तक्रार केली, त्यावरुन गावकऱ्या समक्ष इलेक्ट्रिक वजन काट्यावर राशनच्या गहू आणि तांदळाचे काही कट्टे मोजले असता त्यातील अनेक



कट्ट्यात तीन किलो पेक्षा जास्त माल कमी मिळाला असल्याचे निदर्शनास आले, त्याचबरोबर अनेक कट्ट्यात दोन किलो पेक्षा जास्त माल कमी आल्याचे दिसून आले त्यावेळी गावकऱ्यांनी तहसील प्रशासनातील अधिकारी श्री विकास बळवंत यांच्याशी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी उर्वरित कमी असलेले राशन नंतर पुढच्या खेपेला देण्याचे हमी दिली असता त्याच वेळी कमी असलेले राशन तुम्ही कुठून देणार..? असा सवाल शेतकरी कामगार पक्षाचे नेते ॲड. नारायण गोले पाटील यांनी केला व जर तुम्ही कमी पडलेले धान्य देत असाल तर तुम्ही काढून पान ३ वर

# सामाजिक स्वास्थसाठी योग आवश्यक –केंद्रप्रमुख उकांडे

**अंमळनेर | प्रतिनिधी**

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी संचलित, भैरवनाथ विद्यालय अमळनेर येथे,२१जून आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना योगा प्रशिक्षक अनारसे आर .एच. व क्रीडा शिक्षक शेळके एस.यु. यांनी विद्यार्थ्यांना विविध योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच अमळनेर(भां) केंद्राचे, केंद्रप्रमुख उकांडे यांनी प्रशिक्षण चालू असताना विद्यालयास भेट दिली असता, विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगून आयुष्यात निर्व्यसनी जीवन जगण्यासाठी योगासने महत्त्वाची



आहेत. तसेच दररोज किमान ३० मिनिटे तरी योगासने करावे.असा मौलिक संदेश देऊन,सामाजिक स्वास्थ निर्माण साठी योग आवश्यक आहे.या वेळी त्यांनी मयुरासन व विविध प्रात्यक्षिक करून दाखवले. भैरवनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. शिंदे सरांनी सांगितले बलशाली भारत , व बलशाली युवा पिढी बनवण्यासाठी सर्वांनी योगासने करावीत. विद्यार्थी दशेपासून योगासन केली तर भविष्यात आरोग्यदायी व निरोगी जीवन अभ्यासातील एकाग्रता टिकून ठेवण्यास पान ३ वर

# नागनाथ मुडेगांवकर यांचे निधन

अंबाजोगाई | प्रतिनिधी

येथील श्री.नागनाथराव



गोविंदराव कुलकर्णी (मुडेगावकर ) (वय - ९३) यांचे रविवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी दुपारी दासोपंत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,एक मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे. खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.दिगंबर मुडेगांवकर याचे ते वडील होत.

# पोलीस आपल्या बांधावर या अभिनव उपक्रमा अंतर्गत अंभोरा पोलीस स्टेशन नंबर एक

**म्हसोबावाडी | प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन यांनी पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक पोलीस ठाणे हद्दीत हा उपक्रम राबविला जात आहे.**

बांधावर जाऊन वाद मिटवीत आहे. तसेच ज्यांचे वाद मिटत नाही त्यांना आपापसात वाद न करता दिवाणी न्यायालयात जाण्याची समज देण्यात येत आहे. बीड पोलिसांनी राबविलेल्या या उपक्रमामुळे बांधावरून होणारे खून, खुणाचे प्रयत्न असे गँभीर गुन्हे कमी होऊन भविष्यात होणारी जीवित व वित्त हानी





टळण्यास नक्की मदत होईल. नागरिक या उपक्रमाचे कौतुक करत आहे. असा उपक्रम सर्व महाराष्ट्रात राबविला गेला पाहिजे अशी सामान्य जनतेची भावना आहे. मंगेश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली अंभोरा पोलीस स्टेशनचे बीट अमलदार व इतर पोलीस अंमलदार पोलीस आपल्या बांधावर उपक्रमांतर्गत थेट बांधावर जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून सदर उपक्रमाचे सर्वसामान्य नागरिकांकडून कौतुक होत आहे. मागील पंधरा दिवसांमध्ये १२ तक्रारी पैकी नऊ तक्रारी पोलीस घटनास्थळी गेल्यामुळे निर्गती/निपटारा झाल्या आहेत.

# नाथापूर ते पंढरपूर पायी दिंडीचे उत्साहात प्रस्थान

नाथापूर | प्रतिनिधी

नाथापूर ते पंढरपूर पायी दिंडीचे आज प्रस्थान होणार बीड तालुक्यातील नाथापूर परिसरातील श्रद्धास्थान भाविक भक्ताचे आधारस्तंभ श्री क्षेत्र जुने गाव हनुमान मंदिर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा आज सकाळी दहा वाजता निघणार असून दिंडीचे हे पहिलेच वर्ष आहे . दिंडीचा मार्ग घाटसावळी, बोरफडी, चाकरवाडी, पिपळगाव, तालुका वाशी, बाळूमामा संस्थान आवरा तालुका भूम, महेश गाव तालुका माढा लोळ, पेट्रोल पंप तालुका कुर्डवाडी मार्गे बाबळगाव वस्ती तालुका पंढरपूर असून अंदाजे एकूण प्रवास १८५ किलोमीटरचा असून दररोज सकाळी नाष्टा दुपारचे जेवण संध्याकाळी ची जेवणाची सोय मुक्कामाची सोय सयोजकांनी केली असून या परिसरातील लोकांनी यामध्ये सक्रिय भाग घेतला असून या दिडीमध्ये भाविक भक्ताने सहभागी व्हावे असे श्रीक्षेत्र जुने गाव हनुमान मंदिर व दिंडीचे मुख्य प्रवर्तक श्री दामोदर चव्हाण त्यांचे सहकारी एकनाथ उनवणे श्री राधेश्याम चव्हाण यांनी असे आवाहन केले आहे .यावेळी दिंडी मार्गस्थ करण्यासाठी गावातील सर्व नागरिक हजर होते.

# चौसाळा येथे परशुराम हिंदू सेवा संघाचा कार्यक्रम उस्फुर्तपणे संपन्न

## बीड तालुका अध्यक्षपदी प्रसाद देशमुख यांची निवड

चौसाळा | प्रतिनिधी

चौसाळा येथे परशुराम हिंदू सेवा संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी बारावी मध्ये परीक्षेत पीयूष प्रदीप पोतरकर यांनी भारतामध्ये ९४५४ रँक घेऊन उत्कृष्ट असे यश प्राप्त केले याबद्दल त्याचे गौरविण्यात आले तसेच यज्ञेश भारत सर्वज्ञ मंदार मिलिंद कुलकर्णी गायत्री संजय शेटे गौरी कृष्णा जोशी आनंद चंद्रकांत भंडारी प्रसाद नितीन कुलकर्णी यांचे सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले यानंतर परशुराम



हिंदू सेवा संघाच्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली बीड तालुका अध्यक्षपदी प्रसाद (बाबू ) देशमुख यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी संजय शेटे व दत्तात्रय देशमुख यांची निवड करण्यात आली सरचिटणीस पदी प्रदीप पोतरकर कोषाध्यक्ष पदी विकास सर्वज्ञ सचिव किरण सर्वज्ञ तालुक्यांची कार्यकारणी घोषित पान ३ वर

# शारीरीक आणि आत्मिक विकासासाठी योग आवश्यक – जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत

बीड | प्रतिनिधी

प्रत्येक माणसाच्या शारीरिक आणि आत्मिक विकासासाठी योगा आवश्यक आहे त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने दररोज योग करणे आवश्यक आहे असे मत जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पोलीस मुख्यालय मैदानात आयोजित करण्यात आलेल्या योग कार्यक्रमात बोलताना सांगितले. यावेळी पोलीस दलाचे योग प्रशिक्षक डॉ. संजय तांदळे यांनी उपस्थित पोलीस बांधवांना योगाचे प्रात्यक्षिक देऊन योगासनाचे फायदे आणि आहाराविषयी माहिती दिली.




यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, राजकुमार मोरे,भारत ठोंबरे आदी उपस्थित होते.

बीड शहरातील पोलीस मुख्यालयात शनिवार दि. २१ जून रोजी सकाळी ५.३० ते ७.३० या कालावधीत आयुष मंत्रालय, कैवल्यधाम लोणावळा पुणे, इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन (आय. एन.ओ.) नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने योग प्रशिक्षक डॉ. संजय तांदळे यांनी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योगाचे प्रात्यक्षिक दिले. आयुष मंत्रालय व कैवल्यधाम यांच्या वतीने पोलीस दलाचे योग शिबिर घेण्याचे हे अकरावे वर्ष आहे. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी उपस्थित पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योगा बद्दल मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना पोलीस पान ३ वर

# परभणी ते पंढरपूर दरम्यान निघालेल्या सायकल रायडर्सचे गटशिक्षण विभाग तथा शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणच्या वतीने अंबाजोगाई शहरात स्वागत

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

परभणी येथील प्रभावती डेली रायडर्स या सायकल ग्रुपच्या वतीने काढण्यात आलेल्या परभणी ते पंढरपूर सायकल वारीचे आज अंबाजोगाई शहरात आगमन झाले असतांना त्यांचे स्वागत शासनाच्या नवभारत साक्षरता या कार्यक्रमा अंतर्गत गटशिक्षणाधिकारी कार्यालय तसेच शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात आले. शिक्षक मैत्री प्रतिष्ठान व गटशिक्षणाधिकारी कार्यालय अंबाजोगाई यांच्या वतीने सदरील सायकल ग्रुपच्या सदस्यांचा स्वागत समारंभ व अल्पोपहार कार्यक्रम तालुका क्रीडा संकुल अंबाजोगाई येथे संपन्न झाला. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाईचे गटशिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार, दैनिक



पुढारीचे पत्रकार गोविंद खरटमोल, तालुका क्रीडा समन्वयक दत्ता देवकते,क्रांतीज्योती सावित्रीबाई सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते राम घोडके, अंबाजोगाई सायकल रायडर्स ग्रुपचे संतोष कदम यांच्यासह प्रभावती डेली रायडर्स ग्रुप परभणीचे अध्यक्ष दीपक तळेकर उपाध्यक्ष संदीप पवार सचिव श्रीनिवास संगेवार ,सामाजिक कार्यकर्ते अंकुश हेडे, आकाश कऱ्हाड, योगेश्वरी पतसंस्थेचे संचालक सय्यद अमजद आदी मान्यवर उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाच्या प्रास्तविकामध्ये शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी हा कार्यक्रम आयोजित करण्यामागची कल्पना विषद केली. प्रभावती रायडर्स ग्रुपमध्ये सहभागी असलेले काही सदस्य हे शासकीय तथा निमशासकीय सेवेत पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार, दि.२३ जुन २०२५ । पान ७

# मोशीतील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण अखेर रद्द; फडणवीस यांची मोठी घोषणा

पुणे: पिंपरी-चिंचवड महापालिका सुधारित विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेला मोशी व तीर्थक्षेत्र आळंदीच्या परिसरातील कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करण्यात येईल. वारकरी, भूमिपुत्र आणि शेतकऱ्यांच्या श्रद्धेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आषाढी वारी पायी पालखी सोहळा पुण्यात दाखल झाला आहे. या ठिकाणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालखीचे दर्शन घेतले आणि वारकऱ्यांशी संवाद साधला.

दोन दिवसांपूर्वी, पिंपरी-चिंचवडमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात मोशी येथील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण रद्द करण्याबाबत ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले होतो.



तसेच, भाजपा आमदार महेश लांडगे यांनीही महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. मोशी, चऱ्होलीच्या नागरिकांची निवेदने स्वीकारा आणि त्यावर सकारात्मक निर्णय घ्या, असे साकडे आमदार लांडगे यांनी घातले होते. त्याला अखेर यश मिळाले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीमध्ये आळंदी शहरा जवळ कत्तलखाण्याचे आरक्षण विकास आराखड्यामध्ये टाकण्यात आले आहे. त्यामुळे श्रीक्षेत्र आळंदी सारख्या देवस्थानाच्या परिसरामध्ये अशा पद्धतीने कत्तलखाण्याचे आरक्षण टाकण्यात आल्याने त्याबाबत सर्व स्तरातून नाराज व्यक्त झाली. प्रशासनाने सदर आरक्षण हटवावे, यासाठी आमदार लांडगे यांनी पाठपुरावा सुरू केला.

पुण्यामध्ये माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, जो काही विकास आराखडा आहे. त्या विकास आराखड्यामध्ये मोशी-आळंदी येथे कत्तलखाण्याचे आरक्षण दाखवण्यात आले आहे. मात्र कुठल्याही परिस्थितीमध्ये कत्तलखाना होऊ दिला जाणार नाही. त्याबाबतच्या आरक्षण वगळण्याच्या आदेश मी दिले आहेत. वारकऱ्यांना आणि वारकरी नेत्यांना सांगू इच्छितो कोणत्याही परिस्थितीत कत्तलखाना होणार नाही.

# दगडूशेठ गणपती ट्रस्टचा पुढाकार!

## ११,७६४ वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी

पुणे : श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळ यांच्या वतीने पुण्यात आलेल्या वारकऱ्यांसाठी जय गणेश रुग्णसेवा अभियान अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात तब्बल ११,७६४ वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. बुधवार पेठेतील जय गणेश प्रांगण येथे झालेल्या या शिबिराचे उद्घाटन ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, आमदार व सरचिटणीस हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झाले.



रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा या ब्रीदवाक्यानुसार आयोजित शिबिरात वारकऱ्यांच्या डोळ्यांची तपासणी, चष्मे वाटप, अंगदुखी, डोकेदुखी, बीपी, शुगर यांसारख्या आजारांची तपासणी आणि मोफत औषध वितरण करण्यात आले.

याशिवाय, फिजिओथेरपी सेवाही उपलब्ध करून देण्यात आली. शिबिरात २५ रुग्णालयांतील ३७५ डॉक्टर आणि अनेक स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. सकाळी १५ हजार वारकऱ्यांना चहा, नाश्ता आणि पाणी वितरित करण्यात आले, तर पालख्यांच्या आगमनावेळी मंदिरासमोर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले.

या शिबिरात प्रवासादरम्यान वारकऱ्यांना येणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांवर उपचार करण्यात आले. ट्रस्टच्या या सामाजिक उपक्रमाचे वारकऱ्यांनी आणि स्थानिकांनी कौतुक केले आहे.

# आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद; डॉ. मोनिका काटे-पानसरे यांचा उपक्रम

पुणे । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली व संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे पुणे शहरात आगमन होताच भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. शहरात हजारो वारकरी दाखल झाले असून, त्यांच्या सेवा-सुविधांसाठी पुणेकरांनी आपली परंपरागत तत्परता दाखवली आहे.

वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत डॉ. मोनिका ओंकार काटे-पानसरे यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर शिवाजीनगर येथील नावाडी पुणे मनपा शाळा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालयात पार पडले.

या शिबिरात १५०० हून अधिक वारकऱ्यांनी सहभाग घेतला. त्यांना विविध आरोग्य तपासण्या, सल्ला व आवश्यक औषधे देण्यात आली. या सेवाभावी उपक्रमास मोहन पानसरे व राष्ट्रीय कबड्डीपटू चंद्रकांत काटे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# मैत्रिणीसमवेत कारमध्ये गप्पा मारणाऱ्या तरुणाकडून पैसे उकळणाऱ्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे निलंबन

पुणे । प्रतिनिधी

मैत्रिणीसमवेत कारमध्ये गप्पा मारणाऱ्या तरुणास धमकावून त्याच्याकडून २० हजार रुपये उकळणाऱ्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. परिमंडळ एकचे प्रभारी पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे यांनी याबाबतचा आदेश दिला आहे. ही घटना मंगळवारी (ता.१७) रात्री विधी महाविद्यालय परिसरात घडली होती.




गणेश तात्यासाहेब देसाई, योगेश नारायण सुतार अशी निलंबन केलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. याप्रकरणी एका तरुणाने डेक्कन पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. विधी महाविद्यालय रस्त्यावरील दामले पथ परिसरात मंगळवारी रात्रीच्या सुमारास तरुण त्याच्या मैत्रिणीसमवेत कारमध्ये गप्पा मारत बसले होते.

त्यावेळी पोलीस कर्मचारी गणेश देसाई व योगेश सुतार हे रात्रगस्तीवर होते. ते दोघेही तेथे आले. त्यांनी तक्रारदारास तुमच्याबद्दल तक्रार आली आहे, पोलिस ठाण्यात प्रकरण न्यायचे नसेल तर २० हजार रुपये दे, अशी मागणी केली. तरुणास दुचाकीवर बसवून कमला नेहरू पार्क परिसरातील एटीएममध्ये नेले. तेथे त्याच्याकडून २० हजार रुपये काढून घेतले. या घटनेमुळे घाबरलेल्या तरुण व त्याच्या मैत्रिणीने डेक्कन पोलिस ठाणे गाठले. त्यानंतर संबंधित पोलिसांची चौकशी करण्यात आली. डेक्कन पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीषा निंबाळकर यांनी दोघांबाबतचा कसुरी अहवाल पोलिस उपायुक्त पिंगळे यांच्याकडे पाठविला. घडलेल्या प्रकाराबाबत दोन्ही पोलिस कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांना माहिती देणे आवश्यक होते, तरीही त्यांनी तसे केले नाही. त्यांच्या वर्तनामुळे पोलिस दलाची प्रतिमा मलिन झाल्याचा ठपका ठेवून दोघांचे निलंबन केल्याचा आदेश पोलिस उपायुक्त पिंगळे यांनी दिले.

# वारीत नक्षलवादाचे आरोप असलेले लोक; सरकारने कबीर कला मंचला रोखलं पाहिजे, अन्यथा...- ह. भ. प. बंडातात्या कराडकर

पुणे । प्रतिनिधी

वारीत नक्षलवादाचे आरोप असलेले लोक पाहायला मिळत आहेत. ते बुद्धिभेद करत आहेत. सरकारने लवकर यांच्यावर कारवाई करावी, अन्यथा वारकरी संप्रदायातील युवक जाब विचारतील. त्यासाठी आम्ही युवक गट तयार केला आहे. त्यावेळी सरकार जबाबदार राहील, असा इशारा ह. भ. प. बंडातात्या कराडकर यांनी दिला आहे. समस्त वारकरी संस्था आणि संस्थान यांच्यावतीने शनिवारी (दि.२१ जून) घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

कबीर कला मंच यांना सरकारने रोखले पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. वारीत अंधश्रद्धा निर्मूलन समिती काय काम करत आहे? असा सवालही त्यांनी केला.

काही पुरोगामी संघटना पालखी सोहळ्यात येतात आणि अपप्रचार करतात. संताचे दाखले अर्धवट दिले जात आहे. त्यामुळे वारकरी



संप्रदायाला बदनाम करण्याचे काम सुरु आहे. वारकरी संप्रदाय सगळ्यात मोठा आहे. त्यांची संघशक्ती मोठी आहे. वाघाचे कातडी पाखरून वाघ होता येत नाही. पण असेच काहीजण काम करत आहेत. काहीजण वारकरी गर्दीचा फायदा घेऊन आपले खोट नाणे चालवत आहेत. वारकरी मुळावर घाला घालीत आहेत. आम्ही कुणाचा द्वेष करत नाहीत. पण मुळावर घाव घालत असाल तर हे लोकांना सांगितले पाहिजे, असे बंडातात्या कराडकर यांनी म्हटले आहे.

**'पंढरपूरला जाईपर्यंत आमच्या मागण्या मान्य करा'**

मोशीत कत्तलखाना होणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. पण त्याची लेखी सूचना निघाली पाहिजे. आमची सरकारला मागणी आहे की, आम्ही पंढरपूरला जाईपर्यंत आमच्या मागण्या मान्य करून लेखी सूचना द्याव्यात. अन्यथा वारकरी संप्रदायाच्या भावना तीव्र झाल्यास आंदोलन होईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# सुपरवायझरने परस्पर बनावट बँक खाती उघडून मालकाला घातला ४२ लाखांना गंडा

पुणे । प्रतिनिधी

मिलेटरी इंजिनिअर सर्व्हिस यांनी कंपनी काळ्या यादीत टाकल्याने बेरोजगार होऊन कर्जबाजारी झाल्याचे सांगितल्याने त्यांनी त्याला सुपरवायझर म्हणून नोकरी दिली. त्याचा गैरफायदा घेत त्याने लष्कराच्या गॅरिसन इंजिनिअरींग च्या कामाचे फायनल बिलाचे चेक बनावट खाते उघडून त्यात भरुन ४२ लाख ४६ हजार ८१५ रुपयांची फसवणूक केली.

याबाबत संदीपसिंग पुरणसिंग अमरसिंग (वय ४०, रा. विमाननगर) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी प्रतिक बेरा (वय ४५, रा. खेरे पार्क, लोहगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार लोहगाव येथील गॅरीसन इंजिनियरिंग कार्यालयात १३ ऑक्टोंबर २०२३ ते २० जानेवारी २०२४ दरम्यान घडला. पोलिसांत दाखल झालेल्या तक्रारीनुसार फिर्यादी संदिप सिंग व त्यांचे वडिल पुरणसिंग यांची संदीप इंटरप्रायजेस नावाची फर्म आहे. त्यांना मिलटरी इंजिनिअरगिं सर्व्हिसमध्ये बांधकामाचे १ कोटी ४९ लाख आणि ५५ लाख ८४ हजार रुपयांचे अशी दोन टेंडर मिळाली होती. त्यांच्या परिचयाचे मनिष राज मलिक यांच्या ओळखीचा प्रतिक बेरा याने त्यांच्याशी संपर्क साधला. माझी कंपनी पी व्ही कन्स्ट्रक्शन ही मिलेटरी इंजिनिअर सर्व्हिस यांनी बॅन केलेली आहे. मी कर्जबाजारी झालो असून घरसुद्धा बँकेच्या ताब्यात गहाण ठेवलेले आहे. तुम्हाला एअर फोर्सचे जे काम मिळाले आहे. त्यात मी सुपरवायझिंगचे काम करतो, असे तो म्हणाला. त्याच्यावर दया येऊन त्यांनी सुपरवायझर म्हणून त्याला कामावर ठेवले. त्याला कोणतेही आर्थिक व्यवहाराचे काम दिले नव्हते. काम जसे पूर्ण होत होते, तसे पेमेंट मिळत होते. त्यानंतर त्याच्याविरुद्ध एका बांधकाम व्यावसायिकाने तक्रार केली. याबाबत गॅरीसन इंजिनिअरींग कडून चौकशी झाली. त्यांच्या कामाची तपासणी होऊन ती सर्व बरोबर असल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांचे फायनल पेमेंट येणे असताना काकीचे निधन झाल्याने ते वडिलांना घेऊन पंजाबमध्ये गावी गेले होते. त्यांनी फायनल बिलाच्या तपासणीच्या वेळी सर्व कागदपत्रांची पुर्तता करावी लागेल, म्हणून त्यांनी कागदपत्रे प्रतिक बेरा याच्याकडे दिली होती. फायनल पेमेंट येण्यास उशीर होणार असल्याचे बेरा याने सांगितले. त्यानंतर त्यांच्या सी ए ने फोन करुन सांगितले, फायनल पेमेंट आले आहे, त्यावरती जीएसटी भरावयाचा आहे. त्यानंतर त्यांनी चौकशी केल्यावर प्रतिक बेरा याने कंपनीच्या लेटरपॅडचा वापर करुन दोन बनावट मॅन्डेट फॉर्म तयार करुन त्यावर संदीप इंटरप्रायझेस या कंपनीच्या नावे खोटी कागदपत्रे तयार करुन त्यांच्या वडिलांची बनावट सही करुन, ट्रान्सफर करुन घेऊन त्यांच्या कामाच्या फायनल बिलाचे ४२ लाख ४६ हजार ८५१ रुपये दुसर्या बँक खात्यामध्ये ट्रान्सफर करुन घेऊन फसवणूक केली. याबाबत सहायक पोलीस निरीक्षक चंदन तपास करीत आहेत.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये योग दिन उत्साहात साजरा

पिंपरी, : आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शहरातील सर्वच १३४ शाळांमध्ये योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळांमध्ये योगासने व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्यसाधून महापालिकेच्या शाळांमध्ये 'एक माता एक झाड' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक,योग प्रशिक्षक, शिक्षकेतर वर्ग, सुरक्षारक्षक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

आयुष मंत्रालयाच्या 'योग संगम' कार्यक्रमामध्ये महापालिकेच्या सर्व शाळांनी सहभाग नोंदवला. सहभागी शाळांना ऑनलाइन स्वरुपामध्ये आयुष मंत्रालयाकडून 'योग संगम प्रमाणपत्र' प्राप्त झाले.





आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने महापालिकेच्या सर्वच १३४ शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी योगासने करुन योग दिन साजरा केला. योग दिनाच्या निमित्ताने शाळेच्या प्रागंणामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत रुची वाढविण्यासाठी योग दिनाचे महत्वाचे योगदान आहे.

_शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आंतरराष्ट्रीय योग दिनाप्रमाणेच येत्या वर्षभर विविध उपक्रम राबविण्याचा महापालिकेचे नियोजन आहे. आजचा उपक्रम हा विद्यार्थ्यांना योगाचे महत्व समजून देऊन त्यांच्या दैनंदिन व्यवहारामध्ये योगाबाबत जागरुकता वाढविण्यासाठी उपयुक्त ठरेल.

_प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत जागरुकता व योगाचे महत्व समजावे, यासाठी प्रत्येक शाळेमध्ये योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योग दिनाच्या व्यतिरिक्तसुध्दा शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांना योग, योगासने याबाबत माहिती देण्याचा व त्यांना त्यामध्ये सहभागी करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

_तानाजी नरळे, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पालखी दर्शनात गर्दीचा फायदा घेत सोनसाखळी चोरी; पुण्यातील धक्कादायक प्रकार

पुणे : आषाढी वारी सोहळ्याला सुरुवात झाली असून संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या पुण्यामध्ये विसावल्या आहेत. उद्या (दि.२२) दोन्ही पालख्या पंढरपूरच्या दिशेने पुढील प्रवासाला निघणार आहेत. शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये आषाढी वारी पालखीमुळे मोठी ग्रदी झाली होती. लाखो वारकरी आणि भाविकांच्या उत्साहामध्ये पुणेकरांनी पालख्यांचे जोरदार स्वागत केले. यामध्ये मात्र चोरट्यांनी देखील हात साफ केले असल्याचे दिसून आले आहे.

पुण्यामधील संगमवाडी येथे संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीची भेट होत असते. संत तुकाराम महाराज यांची देहूमधून तर संत ज्ञानेश्वर महाराज यांची आळंदीहून पालखी पंढरपूरच्या दिशेने निघते. दोन्ही पालखी सोहळ्यामध्ये हजारो दिंड्या आणि लाखो वारकरी सहभागी होत असतात. यामध्ये अनेक माय माऊली देखील सहभागी होतात. तसेच पालखी पाहण्यासाठी देखील महिलांची मोठी गर्दी होत असते. याचा गैरफायदा चोरट्यांनी घेतला असल्याचे दिसून आले आहे.



पालखी सोहळ्यासाठी बोपोडी चौक व खडकी रेल्वे स्टेशन परिसरात चोरीची घटना घडली आहे. पालखी सोहळ्यासाठी जमलेल्या गर्दीचा गैरफायदा घेत चोरट्यांनी ज्येष्ठ महिलेसह दोघींकडील सोन्याचे मंगळसूत्र चोरी केल्याची घटना घडली. याप्रकरणी खडकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जूनी सांगवी येथील ६८ वर्षीय महिलेने तक्रार देखील दाखल केली आहे. शुक्रवारी (दि.२०) दुपारी बोपोडी चौक व खडकी भागात या मंगळसूत्र चोरीच्या घटना घडल्या आहेत. तक्रारदार महिला या संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी बोपोडी भागात आल्या होत्या. दुपारी सुमारे एकच्या सुमारास मोठी गर्दी होती. हा गैरफायदा घेत चोरट्याने त्यांच्या गळ्यातील आणि त्यांच्या सोबत असलेल्या दुसर्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबविले. मंगळसूत्र चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी खडकी पोलिसांत धाव घेतली.

तक्रारदार महिलेच्या तक्रारीनंतर आता खडकी पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत. दरम्यान, दरवर्षी पालख्यांच्या गर्दीमध्ये चोरटे सक्रीय होतात. महिलांकडील मंगळसूत्र चोरीच्या घटना घडतात. त्याला आळा घालण्यासाठी गर्दीच्या ठिकाणी पोलिसांकडून साध्या वेशात पोलिसांची नियुक्ती केली जाते. मात्र, तरीही चोरीच्या घटना घडत आहेत. आता देखील तीन महिलांच्या मंगळसूत्राची चोरी झाली आहे.

# लोणावळा शहराजवळील प्रसिद्ध 'कातळधार' धबधबा पर्यटकांसाठी प्रतिबंधित

लोणावळा - पर्यटक आणि ट्रेकर्स यांचे आकर्षण असलेला कातळधार धबधबा सुरक्षेच्या कारणास्तव पर्यटकांसाठी प्रतिबंधित करण्यात आला असून वनखात्याने त्यासंदर्भात आदेश पारित केले आहे.

लोणावळा शहराजवळील राजमाची किल्ल्याच्या मार्गावर असलेल्या कातळधार धबधब्याला पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात. मात्र या धबधब्याकडे जाणारी पायवाट निसरडी आणि प्रचंड धोकादायक झालेली असल्याने तसेच या मार्गावर अनेक ठिकाणी दरडी सैल झाल्या असल्याने राजमाची ग्रामस्थांनी हा धबधबा पर्यटकांसाठी बंद करावा, अशी मागणी पोलीस आणि वन खात्याकडे केली होती.

त्याअनुषंगाने कातळधार धबधब्याकडे जाण्यास प्रतिबंध करण्यात आला असून तसे फलक वनखात्याकडून जागोजागी लावण्यात आले आहे. याशिवाय राजमाची किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर ऑफरोडिंग



करणाऱ्या वाहनांना देखील बंदी घालण्यात आल्याची माहिती वनपरिमंडळ अधिकारी सागर चुटके यांनी दिली.

धबधब्याचा पाण्यात भिजण्याची मजा लुटण्यासाठी राजमाची कडे येणाऱ्या पर्यटकांचा हिरमोड होऊ नये यासाठी या मार्गावर फणसराई भागात असलेले ५ ते ६ धबधबे मात्र पर्यटकांसाठी खुले ठेवण्यात आले असून त्याठिकाणी सुरक्षित पर्यटनाचा आनंद पर्यटकांनी घ्यावा, असे आवाहन वनखात्याकडून करण्यात आले आहे. खरंतर एखादी दुर्घटना घडल्यावर प्रशासनाला जबाबदार धरले जाते. मात्र प्रशासनाने दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करून पर्यटक अतिउत्साहीपणा दाखवतात आणि त्यानंतर कुंडमळ्या सारख्या एखाद्या दुर्घटनेचे बळी ठरतात.

त्यामुळे प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करीत सुरक्षित पर्यटन करणे, ही सर्व पर्यटकांची जबाबदारी आहे. व्यवसायापेक्षा पर्यटकांची सुरक्षितता अधिक महत्त्वाची असल्याच्या भावनेने राजमाची ग्रामस्थांनी केलेल्या मागणीवर पोलीस प्रशासन आणि वनखात्याकडून सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे.